Six monthly............3 " 8 as.
Single copy..............................4 as.

सालअखेर ११ ...८

किरकोळ अंकास.............................४

नोटीशीबद्दल.

१० ओळींचे आंत रु० १

पुढें दर ओळीस ०।१।०६

दुसरे खेपेस ......०।१

Advertisements
Below 10 lines...2Rs
per line over10...4as.
Repetition derline3as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.

AKOLA MONDAY 7 JANUARY 1889

VOL XXIII — NO. I

अकोला सोमवार तारीख ७ माहे जानेवारी सन १८८९ इ०

वर्ष २३ — अंक १

### NOTICE.

The following dates are fixed for the sale of Abkari Contracts (Country Spirits, Tari, Opium and Drugs) in the Hyderabad Assigned Districts for the year 1889-90.

The sales in each place will take place at the Court-house of the Deputy Commissioner at 12 o'clock

Amraoti... Monday...21 Janry 1889.
Ellichpur... Do.......28th, .. Do....
Akola...... Do.......4th, Febry. 1889
Buldana... Do ... . 11th,... Do......
Bassim... Thursday 21st.... Do......
Wun (Yeotmal) Monday 4th March 1889.

Information regarding the conditions of the auction and of the contracts may be obtained at the district office.

J. Wade.
Superintendent
For Commissioner
Hyd: Assigned Districts.

### नोटीस.

रा. अण्णाजी बापुजी जोशी राहणार कसबे शेंदुरणी यांस गोविंदराव विष्णु ओक राहणार शेंदुर्णी यजकडून नोटीस देण्यांत येते कीं आमचे जवळ श्रावण वलद मल्हारी तेली याचे कजचे शेंदूर्णी येथील गहाण असलेलें शेत आम्हीं रुपये २५० ऐवजी तुम्हापाशीं तात्र गहाण टेऊन तुमचे ताब्यांत दिलें होतें तें गहाण सोडविण्याचा करार भरल्यावर आम्हीं रुपये २५० तुम्हास देण्या करितां व गहाण शेत सोडवून घेण्यास आलों होतों परंतु तुम्हीं गहाण मिळकत सोडून देण्याचे कबूल केलें त्याज वरून हल्लीं या लेखी नोटीसानें कळविण्यांत येत आहे कीं तुम्हास ही नोटीस पावल्या पासून चार दिवसांचे आंत रुपये २५० तुम्हास देण्या करितां आणले होते ते त्याच दिवशीं आम्हीं रा. चिमणाजी श्रीपत नाईक शेंदूर्णीकर यांजपाशीं अनामत ठेविले आहेत ते तुम्हीं परभारें घेऊन आमचे गहाण सोडून देऊन गहाणखत सदर्हू नाईक मजकूर यांचे स्वाधीन करावें जर या प्रमाणें तुम्हीं करणार नाहीं तर तुम्हावर कायदेशीर रीती प्रमाणें गहाण मिळकत सोडवून घेण्या बद्दल आम्हास दिवाणी कोर्टांत दावा करणें भाग पडेल व संपूर्ण कोर्टखर्च व या नोटीसीचा खर्च याची जबाबदारी तुमचे शिरावर बसेल शिवाय जे दिवशीं आम्ही रुपये २५० तुम्हा कडेस घेऊन आलों होतों व जे रुपये घेऊन गहाण मिळकत सोडून देण्याचे तुम्हीं नाकारलें त्या दिवसा पासून आमचे शेत आमचे कबजात येईपर्यंत स्वामित्वा बद्दल दरसाल रुपये १०० व आमराई चे उत्पन्ना बद्दल रुपये ५० या मानानें जी रकम होईल ती तुम्हां पासून कोर्ट मार्फत भरून घेतली जाईल कळावें ता० २ जानेवारी सन १८८९ इ०

( सही )
गोविंद विष्णु ओक.
दस्तुर खुद

K. B. Rele and caclousco smosteffi.
PREPARATIONS.

१ धातु पौष्टिक शक्तिवर्धक गोळ्या.

शरीर निरोगी सदृढ करणाऱ्या गोळ्या ह्याच आहेत अति श्रमानें व हरएक दुसऱ्या कारणांनीं झालेलां क्षीणता, मुखावरची निस्तेजता, पांडुरता, मनाची उदासीनता, जीर्णज्वरानें, हगवणीनें खोकल्यानें झालेली क्षीणता, स्वप्नावस्था, मस्तकशूळ, कटीशूळ, निद्राभंग, गंडमाळा, क्षयरोग, रजस्वलास्थीतीमध्यें पोटांत दुखणें, धातु जाणें, वाईट स्वप्नें पडणें, हीं ह्यांच्या सेवनानें, नाहींशीं होऊन तोंडावर टवटवी येतें मज्जातंतूस तीव्रता येऊन स्मरण शक्ति वाढते काम व अभ्यास करण्यास उल्हास येतो. तोंडास रुचि येऊन भूक लागते. पाचनशक्ति वाढते. ते प्रत्येकानें ह्याचा अवश्य अनुभव घ्यावा. किं० १२ आणे

२परम्यावर खात्रीचें वस्ताद औषध.

हें बिनधोक अत्युत्तम त्वरित गुणकारी आहे. लघवीची जळजळ, तिडिक, धातु जाणें ही तात्काळ बंद होतात परमा कितो ही जुना व हट्टी असला तरी निश्चयात्मक बरा होतो. किं० १ रु०

३ परम्यावर पिचकारीचें औषध.

हें ही परम्यावर रामबाण आहे. किं० ०८ आणे.

४ धुपणी ( प्रदर ) वर अमोलिक औषध

सर्व प्रकारच्या नव्या व जुन्या धुपण्या ह्यानें हटकून जलद बऱ्या होतात. भूक फार लागते. रक्तशुद्धि होऊन शक्ति येते. किंमत १ रुपया.

५ धुपणीवर पिचकारीचें औषध

वरील औषधा बरोबर हे वापरल्यानें रोगी रोगमुक्त झाला नाहीं हें क्वचितच. किंमत ०८ आणे.

६ सर्व प्रकारच्या जखमांवर मलम.

घट्टा, चांदी, सर्व नव्या व जुन्या जखमा घाय इ० मीटविणारे मलम कायतें हेंच किं० ८ आणे.

७ खोकल्यावर अचुक औषध.

ह्यानें कफ सुटा पडतो, पडसें, दमा जातो, क्षयाचा,, डांग्या वगैरे गुदगुली होऊन येणारी इ० खोकले अचुक बरे होतात. किं. १२ आणे

८ तापावर रामबाण औषध.

हिंवताप, पाळीचाताप, अंतरताप; जीर्णज्वर, ह्यांवर तर हें रामबाण आहे. जंगल किंवा म्यालेरियस [illegible] तापावर हें व स्ताद आहे [illegible] अन्न पचतें. किंमत १२ [illegible]

९ अ[illegible]र, ह्यांवर औषध.

अजीर्ण, अ[illegible]र. संग्रणी, अग्निमांद्य, आमरक्ताची व साधी हगवण इ० बंद करण्यांत हें कधीच मागें हटले नाहीं. किंमत १२ आणे.

ह्या औषधांच्या गुणाविषयीं ज्या अनेक सर्टिफिकीटा मिळाल्या आहेत त्यांपैकीं एकाचा सारांशः—

"के. बी रेळे यांस लिहावयास अत्यानंद वाटतो कीं, मजकडे पाठविलेलीं सर्व (वरील) औषधीं मी लक्ष पुर्वक तपासून पाहिली. तीं फार गुणकारी असून निर्धोक आहेत.

( सही ) डाक्टर वि. वि. गोखले,
"एम. ए. एम. डी"

सुचना--अनुपानाचा कागद औषधा बरोबर असतो घाऊक घेणारास चांगलें कमिशन मिळेल. प्यांकिंग व पोस्टेज शिवाय पडेल.

विशेष सूचना—आमच्या वरील औषधां शिवाय सर्व प्रकारची दुसरी इंग्रजी औषधें जसे, पेनकिलर, क्लोरोडाईन, पेपरमिंट, काडलिव्हर आईल, वाऱ्याचीं तेलें मलम, साबू, पोट्याश, टिंकचर्स, सलाईन्स इनेज फुरुट साल्ट, वैद्यांस दवाखान्या करितां लागणारीं औषधें व शस्त्रें, वगैरे व तरुण व वृद्ध ह्यांस लागणारे उत्तम गारेचे चष्मे, मुंबईंत आल्या शिवाय, लागण्या योग्य नबरांचे पाठविण्यांत येतील त्याच प्रमाणें औषधांचीं व इतर पुस्तक ही पाठविण्यांत येतील.

पैसे आल्यास किंवा व्हाल्युपेएबल पार्सलनें औषधें व इतर सामान पाठवूं नाटपेड पत्रें पाठवूं नयेत. पत्रव्यवहार खालील पत्यावर करावा.

पत्ता. के. बी रेळें कंपनी,
जुबिली मेडिकल हॉल
कावसजी- पटेल स्यांकरोड मुंबई
हीं औषधें सर्व इंग्रजी औषध विकणाराकडे व मालकाकडे मिळतील.

"TO THE DEAF."

A person cured of Deafness and Noises in the Head of 23 years, standing by a Simple Remedy, will send a description of it free to any Person who applies to J. H. Nicholson, 5 Old Court House Street, Calcutta.

बहिऱ्यांस

बाहिरेपणा आणि २३ वर्षांचा कर्णनाद यास गुण आणणारे सोपें औषध.

जे. एच्. निकलसन, ५ वी ओल्ड कोर्ट हौस स्ट्रीट कलकत्ता, यांस पोस्टपेड पत्र पाठविले असतां औषधाबद्दलची माहिती फुकट पाठविली जाईल.

राजमाचीकर व साठे न्यायाश्रयकर्ते पुणें यांनीं नवीन तयार केलेला.
हिंदुस्थानचा कराराचा आक्ट.
सन १८७२ चा ९ वा
समजुतीच्या टिपा व मुंबई, कलकत्ता, मद्रास व अलाहाबाद हायकोर्टांचे निवाड्यां सुद्धां
किंमत रु० २॥ व टपाल खर्च ०६ आ.

हीं पुस्तकें आमचे छापखान्यांत व सदाशिव काशीनाथ आणि कंपनी यांचे दुकानीं विकत मिळतील.

## पत्रव्यवहार.

ह्या सदरा खालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मताप्रमाणें मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—
उमरावती ता. ३१-१२-८८.
यांचे सेवेशी.

सा० न० वि० वि० उमरावती येथें होणाऱ्या वक्तृत्वोत्तेजक सभेची तारीख ११ जानेवारी सन १८८९ इसवी शुक्रवार रोजीं नेमल्याची जाहिरात पूर्वी आपले पत्रीं एकवार प्रसिद्ध झाली आहे. ती कांहीं अनीवार्य अडचणा मुळें तारीख २५ जानेवरी सन १८८९ शुक्रवार रोजीं ठरविण्यांत आली यास्तव आपण मेहरबानगी करून सदर्हू बदललेली तारीख आपले पत्रीं खालीं लिहिल्या प्रमाणें छापून प्रसिद्ध करावी.

तारीख बदलली.

उमरावती येथें होणाऱ्या वऱ्हाड वक्तृत्वोत्तेजक सभेची तारीख ११ माहे जानेवारी सन १८८९ इसवी शुक्रवार रोजीं ठरली होती ती कांहीं विषेष सोई करितां बदलून तारीख २५ जानेवारी सन १८८९ शुक्रवार हा दिवस सभेच्या समारंभाचा नमुद करण्यांत आला आहे असें सदर्हू सभेचे सेक्रेटरी यांनीं कळविल्या वरून आम्ही प्रसिद्ध करीत आहों. तसेंच या सभेच्या तर्फे सेक्रेटरी यांनीं जाहिर केलेल्या दोन विषयां खेरीज आणखी नवीन तिसरा विषय ही प्रसिद्ध करण्या विषयीं सेक्रेटरी यांनीं विनंती केली आहे.

विषय तिसरा.

भावांत किंवा भाऊबंदांत तंटे उत्पन्न होण्याचीं कारणें कोणतीं? अशा प्रकारच्या तंट्यांनीं त्यांचें नुकसान कसें होतें? हे तंटे व त्यां पासून होणारें नुकसान टाळण्याचे उपाय कोणते? या विषयाचें वक्त्यानें प्रतिपादन करणें.

सदरहु विषयास रुपये १५ चें एक बक्षीस ठेवण्यांत आलें आहे. मागें प्रसिद्ध केलेल्या दोन विषयास ज्या शर्ती लागूं आहेत त्या याही विषयास लागूं आहेत. तथापि उमेदवारांचे अर्ज तारीख २० माहे जानेवारी सन १८८९ इ०पर्यंत घेतले जातील.

श्रीधर रामचंद्र पिंपळखरे
वासुदेव नारायण जोग
सेक्रेटरी
वऱ्हाड वक्तृत्वोत्तेजक सभा उमरावती.

रा० रा० वऱ्हाडसमाचार कर्ते यांस.
वाशीम ता० २-१-८९ इ०

कृतानेक सा० नमस्कार वि० वि० थंडीचा अमल चालू आहे. गव्हांची पिक फार उत्तम आहेत. सावमनकुरी कपाशी फार चांगली

पिकली ज्या शेतांत दोन खंडी ज्हावपाची तेथें तिपट चौपट झाली. शेतकरी लोकांनां फार आनंद झाला आहे. व्यापारी लोकांची कपाशी खरेदी करण्यांत व लावणीची घरीं आणण्यांत फार घाई उडून गेली आहे. पाऊस जरी कमी झाला तरी पिकांची स्थिती उत्तम आहे. एकें प्रकारें नशीबच समजलें पाहिजे.

एथील इं० म० शाळेचें काम उत्तम प्रकारें चाललें आहे. आ ७व्या इयत्तेंत ६ विद्यार्थी पास झाले ह्मणजे जितके परीक्षेस गेले होते तितके सर्व पास झाले आहेत हे सर्वजण पुढें शिकण्या करितां आकोला उमरावतीकडे चालते झाले. ह्या शाळेंत गणपत मधुसिंग नांवाचे कोणी रजपुत जातीचे पंधरा रुपयावर मास्तर होते त्यांनीं येथें दोन वर्षें उत्तम प्रकारें काम केलें. आपलें वर्गाविषयीं फार काळजी बाळगीत. यांनीं मुलें नेहमी खुष असत. हे मोठे हुशार होते. यांचें काम लक्ष्यांत आणून वरिष्ठानीं यांस कायमची पंधरा रुपयाची जागा यवतमाळ येथें दिली. जाते वेळीं मुलांनी त्यांना पानसुपारी केली व आपली गुरूभक्ति प्रदर्शित केली. कित्येक प्रसंगीं त्यांचें व इतर लोकांचें जमत नसे हा केवळ तारुण्यपणा व व्यवहार ज्ञानाभावाचा परिणाम होय. मनुष्यानें संसार यात्रे करितां तारू हाकारलें ह्मणजे त्याला मुळारंभी अनेक अडथळे येतात. परंतु जसा जसा त्याला प्रापंचीक गोष्टींचा अनुभव येत जातो तसा तसा तो सुधारत जातो. लोकाशीं कसें वागावें हें त्याला समजतें. एकंदरीनें सिंगानीं येथें नांव गाजविलें व चांगली कीर्ति ठेवून गेले हें उत्तम झालें. त्यांचें जागीं लाविलेले इसम मि० मोहोन मनुलाल हे आमचे गांवचेच आहेत. तेव्हां त्यांचे विषयीं आह्मास फार अभिमान आहे. तेही मि. गणपतसिंग प्रमाणें मुलांची व आपलें कामें उत्तम प्रकारें करून वरिष्ठांची मर्जी संपादन करतील अशी आम्हास फार उमेद आहे. हे मोहोनलाल मुंबईस मॅट्रिक्युलेशन करितां गेले होते. परंतु त्यांचें नांव पास झालेल्या विद्यार्थ्यांच्या यादींत प्रसिद्ध झालें नाहीं. त्यावरून बिचाऱ्याचा पास होण्याचा सर्व संभव हुकला. मेहनत व्यर्थ गेली. व खर्च केलेला पैसा फुकट गेला. असें होऊन मनाला दुःख मात्र झालें. असो मिस्तर मोहोन लालजी हिंमत न सोडतां खानगी रीतीनें पुनः जावे व आपलें हेतु सिद्धीस न्यावे. येथें मि. नगरकर या आडनांवाचे कोणी गृहस्थ पी. इ. पास होऊन आलेले आहेत. वऱ्हाड शाळा खात्यांत दोन परीक्षा पास झालेला इसम जर एकादा कोणी पंचवीस रुपयांवर असला तर मि० नगरकर हेंच असतील अलीकडे नोकरी मिळणें मोठे दुर्मिळ झाले आहे. तेव्हां आपला प्रथमतः हात सरसावण्या करितां त्यांनीं इतक्या थोड्या पगाराची जागा पतकरली हें फार उत्तम केलें. व हल्लीं न्याहि गुणग्राहक वरीष्टांच्या अंमला खालीं त्यांची योग्यता लवकर पाहिली दृष्टी जाईल यांत संशय नाहीं. बिचाऱ्याच्या योग्यतेनुरूप बिचाऱ्याची लवकर बदली होवो असें मनापासून लोक इच्छित आहेत. हे सुस्वभावी असून शिकविण्याचें काम चांगलें करितात असे गांवांतील मुलें ह्मणतात. स्वतः आम्हांस जरी त्यांचा अनुभव नाहीं तरी दोन परीक्षा पास झालेला इसम योग्यच असला पाहिजे.

हल्लीं जिल्हाधिपतीची स्वारी रिसोडाकडे आहे असें ह्मणतात. कांहीं दिवसांनीं येथें येईल असें समजतें. मि० बळवंत राजाराम कावळे हें पुसदाहून बदली तहशिलदारीवरून परत आले व आपले क्लार्क आफ दी कोर्टाचे जागीं रुजूं झाले. मि० दहीगांवकर आपले गांवीं (Buldana) परत गेले. मिस्तर कावळे रजा घेणार अशी गांवांत वंदंता पसरली आहे कदाचित ते रजेवर गेल्यास मीस्तर दहीगांवकरच पुन्हा क्लार्क आफ धी कोर्टाचे कामी येतील असें म्हणतात. पाहावें पुढें काय होतें तें. तेच येतात किंवा कोणी दुसराच पुढें येतो. डेप्युटी क्लार्कची जागा अजुन पक्की भरली नाहीं दोन वर्षे होऊन गेली ती मिळण्या करितां बहुतांनी खटपटी केल्या. परंतु अजून [illegible] झालें नाहीं असें म्हणतात आतां [illegible] कोणाचें नशीब उदयास ये[illegible] मनुष्यांना सिव्हील खात्याची [illegible]वत नाहीं तेव्हां अखेर कोणी तरी [illegible]प्या डोक्याच उत्पन्न होईल किंवा कोणी सिव्हील खात्याची हवा सोसण्या जोगा ग्राजूएट येईल कोण जाणें!

मे. डे. ए. इनस्पेक्टर साहेब यांची स्वारी बाशीम तालुक्यांतील शाळांची परीक्षा संपऊन पुसद तालुक्याकडे गेली हे गृहस्थ काम करणारे बांक आहेत असें लोक बोलतात. एकाच पगारावर फार दिवस आहेत अजून त्यांना बढती मिळत नाहीं. वऱ्हाड शाळाखात्याचा टापु लहान तेव्हा लवकर बढती सहसा मिळत नाहीं. यामुळें लोकाना हुशारीनें काम करण्यास उत्तेजन वारंवार मिळण्याची साधनें या ठिकाणीं फार कमी.

हल्लीं म्युनिसिपालिटीचे रस्ते आहेत त्यांत उत्तम प्रकारचे ठेवण्याची तजवीज चालूं आहे. म्यु० पा० चे क्लार्क मि० नारायण परशराम हे या कामीं फार मेहनत घेतात असें पाहण्यांत येतें. सर्व कामाचा बोजा या गृहस्थांवरच आहे. याच्या दक्षतेमुळें सर्व कामें चांगलीं चालतात. आता कचऱ्या करितां बहुधा सर्वत्र पेट्या ठेविल्या आहेत. त्यांत लोक कचरा टाकितात किंवा कसें याची देखरेख ठेवण्यांत येते. शहर सपाईचे काम एकंदरीनें चांगलें असा मध्यें ठेविलें आहे. येथून च्यार पांच कोशांवर मोहाजे म्हणून रिसोडास जातांना वाटेवर लाहानसें खेडें आहे. त्या गांवीं महामारी अशांत उत्पन्न झाली आहे असी वार्ता ऐकूं येतें. ही दहशतीची वार्ता ऐकून याचा धक्का एकदम बसतो. अशांत हवा चांगली पडते असें असतां भलत्याच वेळीं असे रोग उत्पन्न होणें म्हणजे इश्वरी अवकृपाच समजली पाहिजे. या रोगाला काळ नाहीं वेळ नाहीं सर्व ऋतु मध्यें हा असतोच. तेव्हां हा उत्पन्न कशा मुळें होतो कोणजाणें.

सरते सेवटी आमचे जिल्ह्यांतून आलाहाबादेस दोन इसम राष्ट्रीय सभे करीतां गेले आहेत. एक आमचे होत करू विकल साहेब मिस्तर दिगे व दुसरे राजे दाजीसाहेब एकून कांहीं खटपट न होतां अखेरीस आमच्या जिल्ह्यांतून इतर खटपटी जिल्ह्या प्रमाणें राष्ट्रीय सभे करीतां Delegates गेले तेव्हां आमचे जिल्ह्याचे मोठें सुदैवच समजलें पाहिजे. राष्ट्रीय सभेचा मोठा माहोत्सव पाहाणें तरी कपाळी असल्या शिवाय घडते कोठचें.

येथील पोष्ट मास्तर मि० त्रिंबकराव हे प्रथमतः एक महिन्याच्या रजेवर गेले होते. ती रजा संपल्यावर त्याणी आणखी तीन महिन्यांची रजा वाढविली असें ह्मणतात. त्यांचे बदली काम करण्यास आलेले इसम ही बरे आहेत काम बरें करितात. असें ह्मणतात मनुष्य लोकप्रिय असला ह्मणजे त्याला लोक बरा असें ह्मणतात. लोकप्रियता संपादण्या करितां खरा मार्ग सोडून द्यावा लागतो. मनाच्या विरुद्ध एखाद्याची स्तुती करावी लागते. खरें बोलल्यानें शत्रुत्व उत्पन्न होते तेव्हां तोंडापुरते बोलणारा व मनाच्या विरुद्ध वागून जर एखाद्यानें लोक प्रियता संपादन केली तर त्याला आपण लोक प्रिय ह्मणाल किंवा कसें. याचा खुलासा होणें मोठें कठीण आहे कळावें हें विनंति.

आपला मित्र

"क्ष"

वऱ्हाडसमाचार.

मिती पौष शुद्ध ६ शके १८१०

## आमच तविसावें वर्ष.

ज्या परमेश्वराच्या योगानें सर्व प्राणीमात्रास उत्पत्ति स्थिति व लय हीं प्राप्त होतात, ज्या सर्व व्यापक ईश्वरानुभवानें सर्व सृष्टि व्यपार नियमित व सर्व मनुष्याच्या व्यवहाराची तंत्रें संकलित आहेत त्या इश्वकृपेनें आमचे वऱ्हाडसमाचार पत्राचे गतवर्ष मोठ्या आनंदानेंपरी समाप्तीस गेलें हें पाहून आह्मा आभारपूर्वक आमच्या वाचकगणाचें व आश्रयदात्याचें अभिनंदन करितों असा एक सर्व साधारण नियम आहे कीं, कोणतें हीं कृत्य आपण हातीं घेण्याचें पूर्वी केवळ त्या कृत्याच्या महत्वभरानेंच दडपून जाऊन तें कृत्य परिपुर्ण करण्यास आपण सर्वथैव असमर्थ आहों असें आपल्या मनानें घेतलें ह्मणजे या कामास हात देखील लविला नाहीं. परंतु असें करणें केवळ चुकीचें आहे. आपल्या मानसिक व शारीर शक्तीच्या हातुन केवढा बोजा उचलवेल हे जेव्हां आपण एखादें काम करितों तेव्हांच समजून येतें. असेंही पुष्कळ वेळां घडून येतें कीं एखादी गोष्ट आपणास मुळारंभीं फारच सुलभ व अल्पायास साध्य वाटावी परंतु जेव्हां तीं गोष्ट वास्तविक करूं लागतों तेव्हां नानाप्रकारचीं विघ्नें व अडचणीं येऊन तीं गोष्ट अगदीं निराशेनें सोडून द्यावीं लागते असो.

जेव्हां छापखान्याचे माजी मालक व प्रकाशक रा. रा. खंडेराव बालाजी हे कैलास वासी झाले तेव्हां त्यांना हा सर्व कार्यभार आमच्या हातीं दिला. आम्हीं अल्पवयस्क व पत्रप्रकाशन कामीं अनाभिज्ञ असल्या मुळें प्रथमतः बराच त्रास व अडचणी आल्या परंतु त्या सर्व अडचणीच यथामति व यथाशक्ति निरसन करून शनैःशनैः कशी तरी करून अम्हीं आपली कर्तव्यता बजवित आलों आहों हीं खरोखर अभिनंदनीय गोष्ट आहे. गतवर्षीं आम्हीं आपल्या पत्रांत ज्या सामाजिक, राजकीय नीति विषयक वगैरे पुष्कळ विषयाची यथामति चर्चा केली आहे ती सर्व आमच्या प्रियवाचकास विदितच आहे त्या विषयी जास्त लिहिणें येथें नको आमचे आश्रय दाते व वाचक निरपेक्ष बुद्धिने आम्हास मदत देत आहेत ह्या मुळें आम्हास प्रात्साहत येऊन आम्हीं ह्या ही पेक्षां जास्ती दक्ष तेनें व काळजीनें स्वकार्य तत्पर होऊं व आपल्या प्रियवाचकाच्या अनन्य भावें करून सेवेस सादर होऊं अशी आंम्हीं ह्या नुतन वर्षारंभी आपली इच्छा प्रदर्शित करून त्यांची तुर्त रजा घेतो. व वर्तमान संवत्सर ही गतवर्षी प्रमाणेंच सुफळ होवो अशी आम्हीं त्या सर्व जगद्व्यापक परमेश्वराची प्रार्थना करितो.

# The Berar Samachar

MONDAY JANUARY 7, 1889

## THE NATIONAL CONGRESS.

'Man is by nature a political being.' So says Aristotle and in this profound expression is centered the elementary nature of the human kind. It is this instinct that gives rise, in its develped approach to perfection, to village communities nations kingdoms &c. These are the political divisions of the globe and our Congress is one of them. This political unit rings in our ears under the harmonious title. The Indian Nation'. Some standard-authorities in politics still doubt whether the 'National Congress' is a strength or a weakness to British rule in India

This question of consolidation and disruption will never be satisfactorily answered as no human being can be the sure prophet who would predict the future possibilities which a political union presages. Anticipations we can form the innate nature of the *Mysterious* corporation of the Indian people and these will reduce the high-sounding question to the simple formula 'whether loyalty and patriotism can exist together.' Patriots begin their puplic affections in their families and culminate them in their concerns about the nation as a whole. The welfare of our Indian Nation is ever secured in the stability of the British administration. No ghost is required to tell us that the advent of the British rule was the advent of a *saviour* to India; and we are therefore, loyal to our rulers, and we shall be so as far as human certainty can go.

Thus the stages and stepping stones from *Indian* patriotism to *Indian* loylty are the progressive grades from the complicated interests of our people to the advancement of the combined interests both of India and England.

It is then a truism, that a Native of India *cân* both be loyal and patriotic. Weshall now proceed to show how long a stride we make in the well-known resolutions of our Indian National Congress. Sir Auckland Colvin had, in one of his fits of sober and cautious observations, remarked:—

सालअखेरें " ७ " ०८

किरकोळ अंकास.............................०४

नोटीशीबद्दल.

१० ओळीचे आंत रु० १

पुढें दर ओळीस ०१०६

दुसरे खेपेस .........०१

Six mon..ly............3 " 8 as.

Single copy..............................4 as.

Advertisements
Below 10 lines...2Rs
per line over10 ...4as.
Repetition derline3as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.

VOL XXIII AKOLA MONDAY 14 JANUARY 1889 NO.2

वर्ष २३ अकोला सोमवार तारीख १४ माहे जानेवारी सन १८८९ इ० अंक २



*K. B. Rele and caclousco smosteffi .*
*PREPARATIONS.*

१ धातु पौष्टिक शक्तिवर्धक गोळ्या.

शरीर निरोगी सद्दढ करणाऱ्या गोळ्या ह्याच आहेत अति श्रमानें व हरएक दुसऱ्या कारणांनीं झालेलीं क्षीणता, मुखावरची निस्तेजता, पांढुरता, मनाची उदासीनता, जीर्णज्वरानें, हगवणीनें खोकल्यानें झालेली क्षीणता, स्वप्नावस्था, मस्तकशूळ, कटीशूळ, निद्राभंग, गंडमाळा, क्षयरोग, रजस्वलास्थीतिमध्यें पोटांत दुखणें, धातु जाणें, वाईट स्वप्नें पडणें, हीं ह्यांच्या सेवनानें, नाहींशीं होऊन तोंडावर टवटवी येते मज्जातंतूस तीव्रता येऊन स्मरण शक्ति वाढते काम व अभ्यास करण्यास उल्हास येतो. तोंडास रुचि येऊन भूक लागते. पाचनशक्ति वाढते. ते प्रत्येकानें ह्याचा अवश्य अनुभव घ्यावा. किं० १२ आणे

२ परम्यावर खात्रीचें वस्ताद औषध.

हें निर्धोक अत्युत्तम त्वरित गुणकारी आहे. लघवीची जळजळ, तिडिक, धातु जाणें ही तात्काळ बंद होतात परमा कितो ही जुना व हट्टी असला तरी निश्चयात्मक बरा होतो. किं० १ रु०

३ परम्यावर पिचकारीचें औषध.

हे ही परम्यावर रामबाण आहे. किं० ०८ आणे.

४ धुपणी ( प्रदर ) वर अमोलिक औषध

सर्व प्रकारच्या नव्या व जुन्या धुपण्या ह्यानें हटकून जलद बऱ्या होतात. भूक फार लागते. रक्तवृद्धि होऊन शक्ति येते. किंमत १ रुपया.

५ धुपणीवर पिचकारीचें औषध

वरील औषधा बरोबर हे वापरल्यानें रोगी रोगमुक्त झाला नाहीं हें कचितच. किंमत ०८ आणे.

६ सर्व प्रकारच्या जखमांवर मलम.

चट्टा, चांदी, सर्व नव्या व जुन्या जखमा वाय इ० मिटविणारे मलम कायते हेंच किं० ८ आणे.

७ खोकल्यावर अचुक औषध.

ह्यानें कफ सुटा पडतो, पडसे, दमा जातो, क्षयाचा,, डांग्या वगैरेंत गुदगुली होऊन येणारी इ० खोकले अचुक बरें होतात. किं. १२ आणे

८ तापावर रामबाण औषध.

हिंवताप, पाळीचाताप, अंतरताप; जीर्णज्वर, ह्यांवर तर हें रामबाण आहे. जंगल किंवा म्यालेरियल नांवाच्या तापावर हें वस्ताद आहे. ह्यानें भूक लागते अन्न पचतें. किंमत १२ आणे.

९ अजीर्ण, अतिसार, ह्यांवर औषध.

अजीर्ण, अतिसार. संग्रणी, अग्निमांद्य, आमरक्ताची व साधी हगवण इ० बंद करण्यांत हे कधींच मागें हटले नाहीं. किंमत १२ आणे.

ह्या औषधांच्या गुणाविषयीं ज्या अनेक सर्टिफिकीटा मिळाल्या आहेत त्यांपैकीं एकाचा सारांशः—

"के. बी. रेळे यांस लिहावयास अत्यानंद वाटतो कीं, मजकडे पाठविलेलीं सर्व (वरील) * औषधीं मी लक्ष पुर्वक तपासून पाहिलीं. तीं फार गुणकारी असून निर्धोक आहेत.

( सही ) डाक्टर वि. वि. गोखले,
"एम. ए. एम. डी"

सुचना--अनपानाचा कागद औषधा बरोबर असतो घाऊक घेणारास चांगलें कमिशन मिळेल. प्यकिंग व पोस्टेज शिवाय पडेल.

विशेष सूचना—आमच्या वरील औषधां शिवाय सर्व प्रकारची दुसरी इंग्रजी औषधें जसे, पेनकिलर, क्लोरोडाईन, पेपरमिंट, काडलिव्हर आईल, वाऱ्याचीं तेलें मलम, साबू, पोंम्याश, टिंकचर्स, सलाईन्स, इनेज, फुरुट साल्ट, वैद्यांस दवाखान्या करितां लागणारीं औषधें व शस्त्रें, वगैरे व तरुण व वृद्ध ह्यांस लागणारे उत्तम गारेचे चष्मे, मुंबईंत आल्या शिवाय, लागण्या योग्य नंबरांचे पाठविण्यांत येतील त्याच प्रमाणें औषधांचीं व इतर पुस्तकें ही पाठविण्यांत येतील.

पैसे आल्यास किंवा व्ह्याल्युपेएबल पार्सलनें औषधें व इतर सामान पाठवूं नाटपेड पत्रें पाठवूं नयेत. पत्रव्यवहार खालील पत्यावर करावा.

पत्ता. के. बी रेळें कंपनी,
जुबिली मेडिकल हॉल
कावसजी- पटेल ट्यांकरोड मुंबई
हीं औषधें सर्व इंग्रजी औषध विकणाराकडे व मालकाकडे मिळतील.



" TO THE DEAF. "

A person cured of Deafness and Noises in the Head of 23 years, standing by a Simple Remedy, will send a description of it free to any Person who applies to J. H. Nicholson, 5 Old Court House Street, Calcutta.

बहिऱ्यांस

बाहेरपणा आणि २३ वर्षांचा कर्णनाद यांस गुण आणणारे सोपें औषध.

जे. एच्. निकलसन, ५ वी ओल्ड कोर्ट हौस स्ट्रीट कलकत्ता, यांस पोस्टपेड पत्र पाठविलें असतां औषधाबद्दलची माहिती फुकट पाठविली जाईल.



राजमाचीकर व साठे न्यायाश्रयकर्ते पुणें यांनीं नवीन तयार केलेला.

हिंदुस्थानचा कराराचा आक्ट.

सन १८७२ चा ९ वा

मध्यंतरीच्या टिपा व मुंबई, कलकत्ता, मद्रास व अलाहाबाद हायकोर्टाचे निवाड्यां सुद्धां

किंमत रु० २॥ व टपाल खर्च ०६ आ.



नोटीस.

सेख मिठु वल्लद सेख इमाम रहाणार हाते हल्लीं मुक्काम हातरूण यास खालीं सही करणार याजकडून कळविण्यांत येतें कीं, तुमचे खात्याचे शेत पानखाशोचे सरकार रुपये १८ चे अह्मास निम्या वाटणीनें दिलें त्याजबद्दल तुह्मास असें कळवितों कीं, आमच्या वाटणीची कपाशी खंडी २ दोन किंमत रुपये ८० ऐशी तुह्मा कडे येणें आहे त्यांत तुमचे देणें कापूस एक मण, चार माणसांची रोजदारी. ज्वारी व जोड्याबद्दल भाडे व निमा वाटणीचा शेत फाळा मिळोन देणें एकंदर रुपये १४०१९ आणे देणें आहे. ते सदरील रुपये ८० त वजा करून बाकी रुपये ६९ ०१ नोटीस पावल्या पासून ८ आठ दिवसांत आणून पावती घ्यावी. असें न केल्यास रीतीप्रमाणें दिवाणींत दावा करून ह्या नोटिशीचे खर्चा सुद्धां अखेर निकाल होई पर्यंत जें नुकसान होईल तें सर्व भरून घेतलें जाईल कळावें ह्मणून दिली नोटीस सही.

तारीख ८ माहे जानेवारो सन १८८९ इ०

( सही )
महमद शाबास वल्लद सेख लाल
रहाणार हातरूण तालुके
बाळापूर दस्तुर खुद्द.



दामोदर काशीनाथ काळे आणि कंपनी यांचा दवाखाना

या ठिकाणीं मनुष्यांचे व गुराचे सर्व रोगांवर औषधें मिळतात.

औषधें घेण्यास फार सुलभ आहेत. कोणत्याही रोगांवर वैद्य व अलोपाथिक डाक्तर जीं औषधें देतात त्याहून आमचे जवळ असलेल्या औषधांनीं फार लौकर चांगला व फार वेळ टिकणारा गुण येतो.

पटकी, मुळव्याध, परमा, आम्लपित्त खरूज, पैण, नायटे, खवंड, हिंवताप, संधिवापू, दमा व खोकला, भगंदर, लहान मुलांचें आंगांत येणें, मुलांचे पोटांतील डब्बा, गरोदर अवस्थेतील ओकारी, बाळंतरोग व इतर प्रकारचे माणसांचे सर्व रोग ह्यांजवर उत्तम गुण देणारीं औषधें आह्मीं आमचे दवाखान्यांत ठेविलीं आहेत.

गुरांचे रोग—पटकी, लाळ, खेसणें, पाठीला लागणें, पोट फुगणें, गळा गुजणें, आवरक्त, आंचळांतून रक्त येणें, क्षतें, पोटांतील कृमी, ज्वर व इतर सर्व रोग यांजवर या दवाखान्यांत औषधें ठेविलीं आहेत. गाई, बैल ह्मशी, हेले, घोडे, कुत्रीं, मांजरें, बकरे, या जनावरांचे सर्व रोगांवर आह्मीं औषधें ठेविलीं आहेत.

या दवाखान्यात रोग्यांना औषधाबद्दल थोडी किंमत द्यावयास लागेल.

बाहेर गांवीं राहणारे लोकांना आपआपले रोगाची हकिकत लिहून कळविली असतां माफकदरानें त्यांस अभिप्राय मिळेल. औषधें मागविलीं असतां जीं औषधें आह्मीं पाठवूं त्यांजबरोबर औषध घेण्याचे माहितीचा कागद पाठवूं.

वर लिहिलेल्या कित्येक रोगांवरील औषधांचे एका कुपींत पांच मनुष्यांस पुरण्याइतकें औषध असतें.

जुने रोग व ज्या रोगांना बरें करण्यास वेळ लागतो अशा रोगांनीं पिडलेल्या लोकांस त्यांची मर्जी असेल तर ठराव करू. ठरावाची जी रकम ठरेल त्यांपैकीं काहीं आगाऊ द्यावी लागेल.

"हा दवाखाना उमरावती येथें भुसार दरवाज्या बाहेर मिस्टर प्रल्हाद नारायण जोग वकील यांचे वाड्यांत खालचे दिवाणखान्यांत आहे."

उमरावती मेडिकल हॉल.ता० २४-१०-८८

दामोदर काशिनाथ काळे आणि कंपनी.



वऱ्हाडसमाचार.


मिती पौष शुक्ल १३ शके १८१०

## चिरायू अन्याय.

मनुष्याची जशी योग्यता असेल, तिजप्रमाणें त्याचे हातीं काम असावें; थोडें कमी प्रतीचें असलें, तर त्यापासून हानी व्हावयाची अगदीं भिती नसते; पण जर योग्यतेपेक्षां मोठें काम एखाद्यास दिलें, तर त्यापासून भयंकर परिणाम झाल्या वांचून रहावयाचाच नाहीं; हें अगदीं खचित समजावें. असें असूनही असा प्रकार ह्या दुनियेमध्यें बेधडक चालला आहे, व याच्या पायीं अनेक वाईट परिणाम घडत आहेत, आणि हे लोकांना उघड दिसत आहेत, तरी याचा बंदोबस्त होतनाहीं. ह्या गोष्टीचा मोठाच अचंबा वाटतो. तसेंच दुसऱ्यापक्षीं पाहूं गेलें असतां अचंबा तरी कशाचा? हा प्रकार कित्येक प्रकरणीं अगदीं आनीवार आहे, व तो कोणत्याही उपायानें नष्ट अगर बंद देखील व्हावयाचा नाहीं असें म्हणणें भाग पडतें. आतां अशीं प्रकरणें कोणतीं ह्याचें स्पष्टीकरणार्थ एक दोन उदाहरणें अगदीं नेहमींच्या प्रवातातलीं सांगतों.

ज्यांना दिवाणी खात्या कडील कामाची अगदीं सामान्य माहिती आहे त्यांना हें खचित ठाऊक असेल कीं कोर्टांतील समन्स, वारंटें, दरखास्त इत्यादि हुकूम बजावण्याचीं कामें बहुधा चारचार पांचपांच रुपये दरमहा

घेणाऱ्यांचे हातून चालते. ते बोलून चालून गरीब; त्यांना दोन पैसे कोणी दिले तरी तो मोठा लाभच वाटावयाचा; विद्येचें नांवही त्यांना ठाऊक नसते; निती कशास म्हणतात हें त्यांच्या गांवीही नसते अशा मनुष्यांनीं आपण दोन आण्याच्या लाभास गुंतून समन्साच्या किंवा वारंटाच्या मनुष्यास सोडून दिलें आणि त्याविषयीं तो भेटलाच नाहीं असा रिपोर्ट जर कोर्टा कडे आणिला तर यांत काय मोठें आश्चर्य आहे! द्रव्य लोभानें मोठ मोठ्याना सोडिलें नाहीं तर ह्या गरीब बिचाऱ्यांचा काय पाड बरें! समन्सें, वारंटें असोंधा. दरखास्त्याच्या बजावणीच्या कामांत तर भारी अन्याय होतो तो इतका कीं त्याचें वर्णनही करतां येणार नाहीं. दरखास्त हातांत आली कीं झाला शिपाई मुखत्यार मग त्या विषयीं तो जें करील तें खरें पुढें विचारायास नकोच. त्यानें लोकांच्या घरांत जावें नाक धरावा, तो आपल्या ताब्यांत घ्यावा, धोंडीशी हातघेपी झाली कीं, हलकेंच काणाडोळा करून त्यांतील मालकास नकोशीचा जो माल असेल तो सोडवा अशीं अनेक तऱ्हेची दुष्ट कृत्यें त्याचे हातून घडता- आणि जर प्रतिवादी चालुच्या शिपाई बुवांचा स्नेही असला तर विचारायास नकोच. त्यांनीं त्याला आदले दिवशींच सांगून पाठवावें कीं उद्यां तुमची सर्व जिनगी जप्त करण्या करितां दरखास्त घेऊन येणार आहेत तर सावध रहा. मग तो आपल्या घरात एकपलंही ठेवीत नाहीं. तो सर्व संसाराचा पसार लांबवितो आणि स्वस्थ हातपाय जोडून बसतो तेथें बाकीनें दरखास्त बजावणारे साहेबांस आपले कडून फार युक्तीनें हलूच दम द्यावे पण तेथें त्या बिचाऱ्यास काय सांपडणार आहे! तो रडत परत जातो; व दरखास्तीच्या छापाची अवेली व्यर्थ गेली म्हणून हिरमुसलें तोंड करून कुरमुरे खात बसतो. ह्या समन्सें, वारंटें, दरखास्त यांचा प्रकार हरहमेश घडत असतोच. असें एक न्याहाळून पाहणाऱ्यास नुसत्या कायदे पत्रा वरूनही समजल्या वांचून रहाणार नाहीं.

पोलीसांची गोष्टही बहुतेक ह्या सारखीच आहे. त्यांचे हातांत लोकांचा नफा नुकसान करण्याचें काम नाहीं; हें खरें. पण ते लोक अब्रूची नुकसानी तेव्हांच करितात. चोरी, मारामारी इत्यादि खटल्या मध्यें एखाद्यानें एखाद्या मोठ्या प्रतिष्ठित गृहस्थाचें नांव घेतलें कीं पोलिसांचें पिकलें. मग त्या मनुष्यास काऊचा बाऊ करून दाखवून मनास वाटेल तसें त्यास नाचवावें. अशा गोष्टी हमेंच होतात असें नाहीं. तरी त्या घडतात ह्यांत काडीमात्र शंका नाहीं. गर्भपाताच्या खटल्यांत तर अशी अंदाधुंदी फार होते. …ळे मनुष्यांचा पंचकयास करण्यांत तर पोलीस म्हणजे सेशन जज्ज्या पेक्षांही अधिक. पंच मिळवून जमादार साहेब किंवा त्यांच्यासारखे दुसरे साहेब निर्णय करतील तो खरा. मग त्यावर कोणाही शंका घेतां कामा नये. आतां हीं सर्व कामें नेहमींच वाईट होतात असें नाहीं. कित्येक पोलीस अंमलदार फार हुषार व चांगले नीतिमान् असतात. त्यांचे हातून मात्र असें कधींही होणार नाहीं. परंतु कित्येक वेळां कित्येकांचे हातून असें होतें. म्हणून हें उदाहरणार्थ येथें दिलें आहे.

आतां ही महत्वाचीं कामें अशा सामान्य मनुष्यांच्या हातून होत असल्या मुळें त्यांत इतकें अन्याय होतात. ते होऊं नयेत असें कोणी मोठ्या मुत्सद्यांनेंही मनांत आणिलें तरी याला त्यानें काय उपाय योजावे बरें. वर सांगितल्या प्रकारचीं कामें स्वरूपतः पाहिलीं असतां हलकीं आहेत; व पुष्कळही आहेत. तेव्हां तीं करण्यास मोठ्या योग्यतेचीं व मोठ्या पगाराचीं आणि पुष्कळ अशीं मनुष्यें कोठून व कशासाठीं सरकार नेमील बरें, न नेमील, तर वरिष्ट अंमलदार चांगले असले तरी रयतेस त्यांचा उपयोग होत नाहीं.

पहा, मुनसफानें न्याय बरोबर केला, पण दरखास्त बजावणारे शिपाई अगर दुसरे कामदार प्रतिवादीस अनकूल आहेत तर त्याचें कांहीं तरी वादीचे हातीं लागेल काय? कांहीं लागणार नाहीं. आणि जर लागणार नाहीं तर मुनसफानें चांगला न्याय केला तो आह्मां रयतेच्या काय उपयोगी!

तसेंच एखाद्या मनुष्याची अब्रू केवळ लोकांतच नव्हे पण सरकारांतही मोठी आहे आणि भलत्याच एखाद्या भयंकर खटल्यांत जर कोणी दुष्टानें त्याचें नांव घेतलें तर त्यास पिंजरा पाहावा लागतो. दुसरी कांहीं ताबच नाहीं अशा गोष्टींत मुख्य सरकार तरी काय करील.

सारांश ह्या गोष्टी नाहीं तशा होणें अगदीं अशक्य आहे. त्या लोकांनीं निरंतर सोसल्या पाहिजेत. व आपलें नुकसान न होण्याविषयीं जपलें पाहिजे. आणि त्या न होऊं देण्याविषयीं वरिष्ट अमलदारांनीं खूप खबरदारी ठेवली पाहिजे. इतकेंच आमचें सांगणें आहे. असे अन्याय नाहींतसें होण्यास सर्व माणसें नीतिमान झालीं पाहिजेत. आणि सर्व मनुष्यें नीतिमान कधींही व्हावयाचीं नाहींत.

## सिंहावलोकन

सन १८८८ इसवी.

नव्या वर्षाचा हा आमचा दुसरा अंक होय. कांहीं अडचणी मुळें सिंहावलोकनाचें काम गेल्या अंकीं करण्यास आह्मास सवड झाली नाहीं. करितां आज तें हातीं घेतों.

गतसालची पहिली महत्वाची गोष्ट लार्ड डफरीन साहेब यांचें स्वदेशीं निर्याण व त्यांच्या जागीं लार्ड लॅन्सडन यांचें आगमन होय. लार्ड डफरीन साहेब प्रथम हिंदुस्थानांत आले तेव्हां त्यांच्या गोड गोड भाषणावरून त्यांची कारकीर्द आपल्या देशास हितावह होईलसें वाटलें होतें; तथापि पुढें ज्या ज्या गोष्टी घडून आल्या त्या वरून त्या सर्व आशा खोट्या ठरल्या. ब्रह्मदेशाचा आहार व त्या साठीं झालेल्या खर्चाची हिंदुस्थानावर लादणी; रशिया व अफगाणिस्थान यामधील सरहद्दीचा कायमचा ठराव व त्या प्रीत्यर्थ झालेला अवाढव्य खर्च, इन्कमटाक्स व केरोसीन तेलावरील कर मिठावरील वाढविलेली जकात इ॰ गोष्टी लोकांची वर्तमानपत्रांची ओरड होत असतां कशा झाल्या हें आमच्या वाचकास स्मरत असेलच. फिनॅन्स कमिशन व सिव्हिल सर्व्हीस कमिशन यांचे रिपोर्ट गतसालीं बाहेर आले. हीं कमिशनें लार्ड डफरीन साहेब यांनीं बाहेरून देश हिताचा मोठा भाव दाखवून बसविलीं होतीं; परंतु त्यांचे जे रिपोर्ट बाहेर आले त्यावरून पहातां आमच्या देशाचा फायदा होण्या जोगें त्यांत कांहींच नाहीं. लष्करी खर्च, होम चार्जीस, गिर्यारोहण, मोठमोठ्या युरोपियन कामगारां… सारखे मिळत असलेले पगार इत्यादि यांच्या योगानें होणारी उधळपट्टी तशीच आहे व सगळी काटकसर विद्याखात्यावर येऊं पहात आहे. सिव्हील सर्व्हीस कमिशनचाही असाच निकाल. शेवटीं डोंगर पोखरून उंदीरच निघाला. यांच्या कारकीर्दींत झणण्यासारखी देशहिताची गोष्ट त्यांच्या पत्नीनें स्थापिलेलें "लेडी डफरीन फंड" होय. याच्या योगानें मात्र आमच्या स्त्रियांचें हित होण्याचा संभव आहे.

रशिया व अफगाणिस्थान या मधील सरहद्द कायमची ठरली असें आह्मी वर लिहिलें; तथापि त्यापासून तादृश फायदा कांहीं नाहीं. रशियाचा पाय मध्यएशियांत जो पुढें सरकत आहे तो मागें हटत नाहीं. मध्यएशियांत आपला पाया मजबूत करण्या करितां त्याच्या अव्याहत लटपटी सुरूच आहेत. रेल्वे तयार केली, इराणच्या दरबारीं आपलें वजन बसविलें, अमीर अबदुल रहिमानच्या विरुद्ध त्याच्या देशांतील गिलझाई वगैरे जातींना चिथावून बंड उठविलें. हें व अशा सारखे त्याचे अनेक प्रयत्न सुरूच आहेत.

सरहद्दीचें संरक्षण हें एक दुःखकारक आमच्या देशाच्या मागें हातधाय धुऊन लागलें आहे केव्हां सरेल ते सरो. बाह्य करिता परहद्दीचें संरक्षण करण्या करितां आमच्या … करला काय खर्च होतो आहे. अमीर साहेब परजावई होऊन बसले आहेत. त्यांनीं वाटेल ती मागणी केली तरी सरकार पुरवीत आहे या शिवाय सरहद्दी वरील डोंगरी व कडव्या जातींना खुष करण्या करितां हजारों रुपये सरकारास उडवावे लागत आहेत. सीकीम, ब्लॅकमौंट, तिबेट वगैरे छोटे खर्च याहिना कांहीं कारण नसतां निव्वळ इंग्रज व्यापाऱ्यांना खुष करण्या करितां गतवर्षीं सरकारनें हातीं धरिल्या व त्या प्रीत्यर्थ लाखो रुपयांचा सप्पा उडविला.

गतसालीं कलकत्याचें प्रसिद्ध देशाभिमानी पत्र अमृतबझारपत्रिका याच्या अचाट उद्योगानें भोपाल संस्थानांतील सरलीपेल ग्रीफीन व त्यांचे अनुयायी कर्नल वॉर्ड यांचीं अनेक कृष्ण कृत्यें बाहेर आलीं व शेवटीं आपण निर्मळ आहे अशा बद्दलचें सरटिफिकिट सरकारजवळून घेऊन त्यांना स्वदेश सुधारावा लागला. बेगम साहिबाचे हाल, त्यांचा अपमान इ॰ कांचें वर्णन करण्यास यावेळीं बर्क शेरीडान असते तर वारन हेस्टिंगवरील मुकदम्याचाच प्रसंग पुन्हा आला असता. असो. सध्या आनंदाची गोष्ट हीच कीं ग्रिफिन साहेब मागून लवकरच त्याच हस्तक कर्नलवार्ड याची तेथून उठावणी होऊन सध्यां एक मुसलमान गृहस्थ त्या संस्थानाला कारभारी मिळाले आहेत.

गतसालीं एतद्देशीय व युरोपियन अशा दोन्ही जातींच्या अंमलदारांवर बरीच संक्रांत बसली पंजाब युनिव्हर्सिटीचे लॉर्वंट, पाटणेचे कर्कवुड, सोलापूरचे नि. एटस व मद्रास कडील कुंन्दी मेनन आणि कुंजी मेनन यांचीं प्रकरणें आमच्या वाचकांच्या स्मरणांतून गेलीं असतीलच. क्राफर्ड साहेबांचें बडें सत्र तर अजून चालूच आहे या शेवटच्या सत्रांत सांपडलेल्या गरीब बिचाऱ्या मामलेदार व डेप्युटी कलेक्टर मंडळीची शेवटची काय वाट होते यांकडे सर्वांचे डोळे लागले आहेत.

हैद्राबादचें बडें अबदुल हक्क प्रकरण गतसालींच उद्भवलें. आमच्या निजाम सरकारच्या मागें हें व यासारखें दुसरे अनेक शनी लागुन त्याची स्थिती मोठी शोचनीय झाली आहे. डेकनमायनींग प्रकरणांत कोट्यावधि रुपयांची डाणी बिचाऱ्याला बसली व शेवटीं अबदुल हक्क बहादुर हैद्राबादेस येऊन नजराणे देण्यास तयारच.

हवापाण्यासंबंधानें मोठाल्या रोगाच्या धाडी सुदैवानें आह्मावर जरी आल्या नाहींत तरी पीकपाण्या संबंधानें आमच्या देशाचे भागोभाग बरेच हाल झाले. गुजराथ, काठेवाड, कोंकण, मद्रास, तिनेवेली इत्यादि प्रांतात पावसाच्या कमतीनें दुष्काळाचीच अवस्था झाली व त्या त्या प्रांतातील सरकारांनीं आणि लोकांनीं रिलीफ वर्क्स सुरु केलीं. नगर सोलापूर वगैरे प्रांतात आरंभी हीच अवस्था झाली होती परंतु मागाहूनचा पाऊस आल्या मुळें बरें झालें. आपल्या वऱ्हाडांत आणि नागपूर प्रांतातही पाऊस अपुरताच झाला … न हीं. मद्रास कडे भयंकर वादळें व गोरखपूर कानपूर, वगैरे ठिकाणीं अतिवृष्टी होऊन प्राणहानी बरीच झाली. साल संपतां संपतां तर मुंबईकडे वैतरणा आगबोट गडप होऊन हजारों प्राण समुद्रात बळी पडले.

समाज सुधारणे संबंधानें आमच्या लोकांना गतसालीं बरीच खटपट केली व … माधवराव, दिवाण बहादुर रघुनाथराव, … रानडे इत्यादिकांचे प्रयत्न सुरूच आहेत. आमच्या प्रिय राष्ट्रीय सभेबरोबर त्यांनीं आपली सामाजिक सभा ही भरविली होती. विधवांसंबंधानें कांहीं गोष्टी … करण्या जोग्या … आहेत तरी नागपूर प्रांतात व मुंबई इत्यादि … संबंधानें चांगली सुरु … खोकल्यावर गोळ्या.

… उष्णतें पासून उद्भवलेला असो प्रसिद्ध पुरुष … पासून असो ह्या गेल्या … दिवशीं गुण दिसूं लागतो, … णपतराव खटके, कृष्णशास्त्री भाटवडेकर, कांचीनचे महाराज, माधवराव केट इत्यादि रत्नें गत सालीं आमच्या देशांतुन हरपलीं.

युरोपांतील राज्य व्यवस्थेंत हा गुदस्ता बरीच गडबड जर्मनीचे एकादर एक असे दोन बादशाहा मृत्युमुखीं पडून त्या देशाला एक सारखा शोक करावा लागला. यांपैकीं एक बादशाहा आमच्या चक्रवर्तिनीचे जामांत असल्या कारणानें इंग्लंड व हिंदुस्थान या देशाची ही एक प्रकारें हानीच झाली. फ्रान्स व जर्मनी यांमधील वैमनस्य सुरूच आहे व प्रिन्स बिस्मार्क हे आतां जर्मनीचे मुख्य चालक असल्यामुळें चकमक झडण्याची भीति वारंवार उत्पन्न होत असे. तथापि परमेश्वर कृपेनें तसा प्रसंग आला नाहीं. तरी युरोपांतील राष्ट्रांची आपसांत चकमकी वाढविण्याचा उद्योग चालूच आहे. फ्रान्स देशांत जनरल बेलाजर यांच्या गडबडीनें बरीच अस्वस्थता झाली होती व त्यांच्या पार्लमेंटांत … अदलाबदली …

ईत आहेत. इंग्लंड व ऐर्लंड यांचा झगडा चालूच आहे. ऐरिश लोक आपला हट्ट सोडीत नाहीं व लार्ड सालिसबरी मंडळ ही माघेत नाहींत ऐरिश पुढारी लोकांस भडाभड ... झाल्या. पार्नेल व त्यांचे अनुयायी यांच्यावर टाइम्सवर आणिलेल्या आक्षेपांची चौकशी करण्या करितां तर एक कमिशनच आहे.

सालांतील अखेरची गोष्ट आपली राष्ट्रीय सभा. या सभेचें पाऊल दिवसें दिवस पुढे घातलें आहे हें पाहून आम्हास फार आनंद होत आहे. सर सय्यद अहमद, राजा शिवप्रसाद, सर आकलंड काल्व्हिन मंडळी हिच्या पाठीं हात धुवून लागले व आमचे यानी व्हाइसराय लॉर्ड डफरीन यांनीं ही जातां जातां आपल्या नावाचा ताशेरा हिजवर झाडला, तरी "सत्यमेव जयते" या न्यायानें हिचा प्रतिवर्षी भरभराटच होत आहे. मद्रासेस या सभेला६०० प्रतिनिधी आले होते ती संख्या यंदा तर१९०० वर गेली व त्यांत विशेष आनंदाची गोष्ट ही की त्यांत २०० प्रतिनिधी सर अहमदच्या जातीचे आले होते आमचे प्रिय देशभक्त दादा भाई नवरोजी व मि. बनारजी विलायतेस जाऊन तेथें या सभे करितां शाखा स्थापन केली व तिकडील लोकांचें आकर्षण करून मि. ग्लडस्टन, मि. ... यांच्या सारखे मित्र संपादिले. सर सय्यद अहमद यांनीं हिच्याच विरुद्ध दि पेट्रीआटिक ( ? ) असोशियेशन नावाची मंडळी स्थापिली परंतु तीचे दोन तुकडे ... न ही स्थापिली ... व त्यांचे दुसरे ... राजा शिव... पक्की बांधलेले दोन बंगले या प्रमाणें गतसालीं ... साधारण अशा गोष्टी आमच्या वऱ्हाड ... च्या गोष्टी आम्ही पुढील अंकी ...

CHIKALDA (BERAR) 589? FEET A... ळीचा मोकळी जमीन ए... १४ एकर आहे. यांतील पांच एकरात काफीची झाडे लावलेली आहेत ... known ...rwood" ...on.

फक्त एक रुपयाप्रमाणें आहे. ...5 Substan... with Galvanized iron and one thatched Bangalow, ...three furnished, together with appro...iate strongly built out offices roofed for ...e most part with galvanized iron to...ther with lands covered by the same ...d adjoining in extent about 14 acres of ...hich about 5 acres are planted with ...earing coffee and the whole subject only ...a ground rent of R. 1 per acre.

Offers for the above property are invited and should be sent before 10th February 1889 to.

Messrs. William Watson and Co.
28th Apollo Street
Bombay.

The Berar Samachar

MONDAY JANUARY 14, 1889.

## HONORARY MAGISTRATES.

On the recommendation of many high officials entrusted with the duties of a District or a province, the Executive authorities, appoint persons of position and respectability as Honorary Special Magistrates. There is no doubt that men having sources of income other than service and also possessed of respectability should help the administration of a country by working in conjunction with executive functionaries of Government. But mere independence in monetary affairs and possession of respectable character are not the only qualifications which the public expect of such men. Education is one of the most important of qualifications required of such persons. And this most essential requisite is often conspicuous by its absence in men of riches and respectable character in India.

These Honorary officials think that they are not as responsible to their superior officers as salaried officers of Government are. This opinion of their personal irresponsibility is also shared by the public at large The result is that punctuality in attendance is not reckoned as a virtue to be observed Again these officers are now and then prejudiced against one party or another who have appeared before them Some times they take a view of things wide of the truth and at other times they take a very optimist view and consider all parties before them as equally honest and good.

The Bombay High Court has very wisely advised the Government of that Presidency not to appoint Honorary Magistrates in the Residency Town. That Government have been sagacious enough to adopt the opinion of the Honorable judges and have not appointed such Honorary Benches of Magistrates in Bombay.

In the Town of Bombay there are men at once possessed of wealth education and position by scores if not by hundreds, and if the advice of their Lordships, the judges of the High Court is considered by that Local Gvot. as worthy of adoption there, how much great is the necessity of its adoption in moffusil places, may be well understood by our readers. And we venture to say that this province of Berar cannot afford to give us public men of the character and education as Bombay Town does. If so, does it not become a matter of serious consideration for the Resident, at Hyderabad whether there should continue to be magistrates here who no doubt are men of position and character but who are wanting in the very essential qualification of education.

The Local Self Government scheme and the electoral Municipalities can well afford to give scope to public spirited men for the exercise of their desire to be useful to the public. In this branch of public administration, such men are not likely to be any way injurious to the community. On the contrary, they will do greater service both to the public and the Government, by taking active part in Municipal Boards, than they render at present as Honorary Magistrates.

## FROM THE RESIDENCY ORDERS.

The undermentioned officers who appeared at the Examination held at Amraoti on the 22 nd, 23rd, 24th October 1888 are declared to have passed by the standards and subjects noted below:---

*Higher standard*

| | |
|---|---|
| Captain R. V. Garrett, Assistant Commissioner. | Law, Revenue, Accounts, and Vernacular. |
| Mr. Rickard MacGill, Extra Assistant Commissioner | Law Revenue, Accounts, and Vernacular. |
| Mr. Hyder Ali Khan, Attache. | Law, Revenue, Accounts and Vernacular. |
| Mr. Venkatesh Krishna, Treasury Clerk, Akola. | Law Revenue, and Accounts. |
| Mr. Wasudeo Vittal Chandekar, Deputy Clerk of Court Amraoti. | Law, Revenue, and Accounts. |
| Mr. Ramchandra Narayan, Clerk of the Deputy Commissioner's Court, Wun district. | Law, Revenue. and Accounts. |
| Mr. Narayensing Babhusing, Naib Tahsildar. | Law, Revenue and Vernacular. |
| Mr. Mahomed Rahimutulla, Naib Tahsildar. | Law, Revenue and Vernacular. |
| Mr. Waman Ganesh, Tahsildar. | Law (Criminal only), Revenue and Account. |
| Mr. Balkrishna Kasinath, Tahsiladar. | Law (Civil only) Revenue, and Accounts. |

*Lower Standard*

| | |
|---|---|
| Mr. G. C, Soobrayulu Naidoo, Tahsildar | Civil law. |

Note.---This officer, having passed by the Lower Standard in Criminal Law, Revenue, Accounts, and Vernaculer at the Examination held in October 1887, is now declared to have passed in all subjects by the Lower Standard.

| | |
|---|---|
| Mr. S. H. King, Extra Assistant Commissioner. | Law, Revenue Accounts, and Venacular. |

Note ---Has accordingly passed by the Lower Standard.

| | |
|---|---|
| Mr. Mahomed Husain, Head Master of the Anglo Hindustani School at Tajnapett. | Law, Accounts and Vernacular. |
| Mr. Pandurang Sakaram, Nazir, Small Cause Court, Amraoti | Law and Accounts. |
| Mr. Ramrao Govind, Naib Tahsildar. | Law and Accounts |
| Mr. Pandurang Tookram, Karkun, Deputy Commissioners Office, Amraoti. | Law (Civil only), Revenue, and Accounts. |

No. 260.

The Resident is pleased to declare that Mr. Manukh Rai, a Sub-Assistant Conservator of Forests in Berar, has passed by the Higher Standard the Examination in Marathi prescribed for Forest Officers in the Hydrabad Assigned Districts Appendix III to the Forest Department Code

Mr. M. J. Scobie, Executive Engineer 3rd grade, sub pro tem. is, on return from furlough, posted to the West Berar Division at Akola.

## वऱ्हाड.

... :—थंडी अलीकडे कमी झाली उ... प्रकाळ लवकरच सुरू होण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत.

... यार्ड ... यांनीं ... बास काऊन चार्ज घेतला.

मि ... रतनजी दस्तुर ए. अ क. यांची बदली झाल्या प्रमाणें ते ... आहेत ... येथें आहे.

मि गार्नेट, ऐ. अ. क. हे दोन महि... त्यांच्या रजेवर जाणार व त्यांचे जागें नयापटन् नारेत. हे येथें येणार अशी वार्ता आहे.

मागील डिपार्टमेंटल परिक्षेंत पुढील प्रमाणें गृहस्थ पास झाले:—कापर ग्यारेट, मेस म्याकगिल, हैदरआली, व्यंकटेश कृष्ण, वासुदेव विटल चांदेकर. रामचंद्र नारायण, नारायणसिंग बभुतसिंग ( लॉ, रेव्हिन्यू, व्हर्नाक्युलर ) महंमद रहिमतुल्ला ( ला, रेव्हिन्यु, व्हर्नाक्युलर ) वामन गणेश ( लॉ— क्रिमिनल, रेव्हिन्यु. अकौंट, ) बाळकृष्ण काशीनाथ, (लॉ (सिव्हिल,) रेव्हिन्यू आकौंट) लोअर— मेस सुब्रायलु नायडु, किंग. महंमद हुसेन (लॉ, आकौंट, व्हर्नाक्युलर) पांडुरंग सखाराम (लॉ, आकौंट) रामराव गोविंद (ला, आकौंट) पांडुरंग तुकाराम (लॉ सिव्हील), रेव्हन्यु, आकौंट).

मे० स्पीडन साहेब कमिशनर यांची स्वारी अकोला तालुक्यांत आहे.

चिखलदरा ( वऱ्हाड ) समुद्राचे सपाटी पासून १८०० फुट वर उंच.

नोटीस—रेव्हरंड एच. डब्ल्यु. ... यांचा "नौल्सवुड" आणि "... उड नांवानें प्रसिद्ध असलेला माल विकावयाचा आहे.

या मालांत मजबूत बांधलेले दोन बंगले आहेत. त्यांवर ग्यालव्हनाइझ्ड लोखंडी पत्र्याचे छप्पर आहे व एक गवती बंगला आहे. या तिन्ही बंगल्यास मजबूत चांगल्या रीतानें बांधलीं आउट आफिसेस असून तीवर बहुतेक ग्यालव्हनाइझ्ड लोखंडी पत्रे आहेत. शिवाय ही व जवळची मोकळी जमीन एकंदर सुमार १४ एकर आहे. यांतील पांच एकरात काफीची झाडे लावलेली आहेत त्यांस काफी आहे. सर्व जमिनीस सारा दर एकरास फक्त एक रुपयाप्रमाणें आहे.

वरील माल ज्यांस घेणें असेल त्यांनीं ता० १० फेब्रुवारी सन १८८९ चे आंत आपण तो माल किती रकमेस घेण्यास तयार आहों हे खाली सही करणारास कळवावें.

मेसर्स वुइलियम वाटसन आणि कंपनी.
२८ आपोलो स्ट्रीट
मुंबई.

## वर्तमानसार.

हिंदुस्थानचें सर्व उत्पन्न इंग्रज सरकारास सुमारे ७०००००००० रुपये मिळत आहे.

दरबार— पायोनियर वरून असें कळतें कीं, लार्ड कान्नस डोन हे येत्या एप्रिलमध्यें दिल्ली येथें दरबार भरविणार आहेत.

हिंदुस्थान सरकारानें सर्व इतर सरकाराकडून पोलिसच्या व्यवस्थेबद्दल अभिप्राय मागविले आहेत असें कळतें.

बोर्निओमध्यें लोकांचा दंगा उत्पन्न झाला आहे असें समजतें.

क्यापटन हर्से नांवांच्या गृहस्थानें अल्लाहाबाद येथील पायोनियरच्या हापिसांत जाऊन त्या पत्राच्या कर्त्यास, त्याच्या संबंधानें कांहीं मजकूर लिहिल्याबद्दल मारहाण केली त्याजबद्दल खटला माजिस्ट्रेटाकडे चालणार असें समजतें.

लुशे लोकांवरच्या स्वारि करितां मद्रास व मुंबई इलाख्यांकडून फौजेच्या लहान टोळ्या रवाना होत आहेत.

मि. के. आर कीर्तीकर हे मेलबोर्न येथून इंग्लंडास जाणार असें समजतें.

सु० प०

प्रस्यांत सर लिपेल ग्रिफिन यांची नेमणूक मुंबई गव्हरनरीवर होणार ह्मणून इंग्लंडचे पत्रकारानीं शिंग फुंकण्यास आरंभ केला आहे.

रुटरचे तारेवरून कळतें कीं जर्मन आणि रशियन यांच्यांत लढाईची तयारी झाली आहे. रशिया आपले बचावाचे तयारींत गढून गेला आहे. पोलंड देशाचे मुख्य शहर वर्सा येथील किल्ल्यांत सर्व प्रकारचा साठा करण्याचें काम मोठ्या धडाक्यानें चालला आहे. कारण हें शहर जर्मनच्या अगदीं सरहद्दीवर आहे. तेथील लोक वस्ती ४०६००० माणसाची आहे, तेव्हां किल्ल्यांतील सामान सर्वांस जरी पुरें पडले नाहीं तरी "जनरल गुरकानी" ह्मणतात कीं, ग्यारीसन फौज ५६००० आहे त्यास तरी ठेवलेला साठा पुरा पडलाच पाहिजे. आतां याहुदी व पोल जातीचे लोक याच वस्तीमध्यें आहेत, त्याच्या उदर निरवाहाची वाट रशीयन सरकार लावणार, नाहींतर ते लोक वस्ती मधून निघून जातील असें वाटतें. डेन्युब नदीवर रशियन सरकारानें पूल बांधण्याचें काम आज १० वर्षांपासून चालविलें आहे त्या लोक वस्तीस व तिकडील सरहद्दीचे संरक्षणासाठीं "रेनी" नांवची फौज ठेविली आहे. त्यांच्या संगोपानापुरतें सामान पुरें पाडणें ह्मणजे रशीयन सरकारास मोठें संकटच येऊन पडलें आहे. परंतु बलगेरीयावर हल्ला करण्याचे भाग पाडले तर वरील किल्ल्यांत साठा केल्या शिवाय परिणामच नाहीं.

तिकडे जर्मनी आपले तयारींत लागली आहे, तोफखाना सज्य राखण्या साठीं २ कोटीची मागणी झाली आहे. त्याचे उत्तरांत प्रधानाकडून जबाब मिळाला कीं, फ्रान्स आणि रशिया यांच्या तोफखान्याचा अधिक बंदोबस्त आहे, तेव्हां त्यापुढें आपला बचाव लागणें मुष्किलीचें आहेसें समजून पैशाची परवानगी देणें मुक्तची राहिलें. म० मि०

मोठी देणगी:— सोफिया येथें एक बलगेरियन युनिव्हार्सिटी स्थापण्या करितां प्रिन्स फर्डिन्याड यांनीं २०,००,००० रुपये देऊं केले आहे.

अमेरिकेतील शाळेंत १ कोटी २० लक्ष मुलें विद्याभ्यास करित आहेत.

पनामाचा कालवा पुरा करण्या करितां जी सोडत निघाली होती ती बुडाली.

त० मि०

क्राफर्ड कमिशन पुढें हल्लीं आरोपी तर्फेचा पुरावा चालू आहे. खुद क्राफर्ड साहेबांचाही जाब झाला. त्यांनीं हल्लीं आपल्यास सुमारें २ लाख रुपये कर्ज आहे ह्मणून सांगितलें.

रुप्याच्या जिनसांवरची जकात लोकरच काढून टाकणार अशी वदंता आहे,

झाडी व पटकी यांचा संबंध—झाडी नसलेल्या गांवांत पटकीचा उपद्रव ज्यास्त बाधतो; तसा झाडी असलेल्या गांवांत बाधत नाहीं, असा अनुभव असल्याचें आमदाबाद व अहमदनगर ह्या दोन जिल्ह्यांतील माहिती असलेल्या एका डाक्टरानें टा० इ० स लिहिलें आहे.

रशियाचे बादशहाचे बंधु हल्लीं हिंदुस्थानांत प्रवास करीत आहेत.

नवीन कालेज— लोणावळें येथें युरोपियन लोकांच्या मुलांकरितां एक कालेज सुरू करण्याचा युरोपियन मंडळीचा विचार ठरला असून त्याकरितां एक लाख रुपये भांडवल जमा करण्याचे प्रयत्न हल्लीं चालले आहेत.

इरोडपुढें रेलवे इतक्यांत सुरू होत नाहीं. असें समजतें. क० त०

विलक्षण चाली व संप्रदाय— स्त्रियांनीं वक्षः प्रदेश मुक्त ठेवणें ही चाल इतर ठिकाणीं हलकी मानतात. मोठ मोठ्या समारंभाच्या थाटाचें वर्णन करणें झालें तर, त्यांत "कोंगयु तुळिच्च मंगमारु" ह्मणजे स्त्रिया स्तन हलवित पुढें आल्या, असें वर्णन करितात !! बाळंतीणीस मूत पाजतात! नूतन उपजलेले बाळक इतर लोक खुशाल घेतात. सुमुहूर्त मिळाल्या वांचून बाळंतीणीस मूत पाजीत नाहींत. बायकांच्या कानांची भोकें येवढी मोठी असतात कीं, त्यांतून वरवंटा खुशाल जाईल! स्त्रिया सुद्धां कौपीन धारण करितात! नायर जातींत मुलीं लग्नच नाहींत! मुसलमान जातींत १। रुपया दिला कीं लागलीच टेंपररी बायको मिळते, नकोशी वाटेल तेव्हां चार पांच रुपये दिले, कीं झाली सुटका!

विलक्षण झोंपाळू— मि. चार्फेट हे यीनबुड येथें १० नोवेंबर रोजीं सकाळीं ९ वाजतां निजले ते १५ नोवेंबर पर्यंत जागे झाले नाहींत. हे सोपा येथें असतांना साहेतेरा दिवस निजले होते.

घोर युद्ध— वाडिया देशामध्यें घोर युद्ध झालें. महादीचे अनुयायी ७०,००० होते, मुलतानाचे लोक थोडे होते. महादीच्या अनुयायांचा पराभव झाला, व त्यांचे ३,००० लोक मेले. नंतर ते परत वळले, व त्यांनीं सुलतानाची राजधानी काबीज केली, व सुलतानाला माऊन्टाविरी येथें पळ काढावयास लाविलें.

मिठाचें उत्पन्न.— एकंदर मिठाचें उत्पन्न ४,२८,७७,००० रुपये झालें. प्रत्येक महिन्याचें उत्पन्न ६१,२६,००० रुपये आहे. बंगाल्यांत १,४३,२१,०००; रुपये उत्तर हिंदुस्थान ९४,२५,०००रुपये; मद्रास १,०६,२२००० रुपये; मुंबई ८०७८,००० रुपये; सिंध ७६,००० रुपये.

चमत्कारिक लग्नसमारंभ— फिलीपाईन बेटांत विवाह लावण्याची चाल चमत्कारीक आहे. दोन लवचिक वृक्षांवर वधुवरांस चढवावयाचें, व त्यांच्या भारानें ते वृक्ष लवून एकमेकांचीं डोकीं एकमेकाला लागलीं ह्मणजे विवाह पूर्ण झाला असें तें लोक समजतात.

कोल्हापुरास कोणी हरदास कीर्तन करीत असतांना एका चावट पोरानें बोवांच्या पाया पडावयाला जाऊन बोवांच्या निऱ्या ओढल्या. व दुसऱ्यानें बुवाला प्रदक्षिणा घालतां घालतां मागून कासोटा फेडला! तेव्हां अर्थात बुवा भर समाजांत दिगंबर झाले मग कोठला मोरोपंत आणि कोठला तुकाराम! चावटगिरीची कमाल झाली ह्मणावयाची !!

न्या० सिं०


## जाहिरात.

## डा. नारायण चिंतामण यांनीं मुद्दाम तयार केलेलीं उत्तम गुणकारी औषधें.

**सूचना**—हीं सर्व औषधें शुद्ध वनस्पतीचीं केलेलीं असुन हजारो लोकांनीं अनुभवलेलीं आहेत. रक्तांत दोष उत्पन्न करणारे रसायनांचा ह्यांत बिलकुल उपयोग केलेला नाहीं. जाहिरांतींतील औषधांवर लोकांची श्रद्धा बसत नाहीं म्हणून रोग्यांना ह्या सर्व औषधांची गरज पडेल तेव्हां निदान एकवेळ तरी मुद्दाम उपयोग करून पाहवा अशी त्यास माझी सविनय प्रार्थना आहे ह्या सर्व औषधांचा उपयोग शेंकडों रोग्यांनीं करून पाहिला व त्यां पैकी तीन चतुर्थांश बरे होतात अशी आमची खात्री झाल्या मुळें तीं प्रसिद्ध केलीं आहेत.

गजकर्णावर रामबाण औषध.

ह्याची तर सर्वत्र प्रसिद्धीच आहे. याचे गुणा बद्दल मिळालेल्या सार्टिफिकिटां पैकीं कांहीं माहितीचे कागदांत दिलीं आहेत. किं. दर बाटली ०९ आ. बंगी करणावळ ०१ आ. शिवाय टपाल खर्च.

खरजेवर हटकून गुणकारी मलम

हें लावलें असतां मुळींच झोंबत नाहीं. तीन चार दिवसांत खरूज बरी होते. याचे ही गुणाबद्दल सार्टिफिकिटें आहेत. किं. दर डबी ०८ आ. बंगी करणावळ ०१ आणा. शिवाय टपाल खर्च.

खात्रीचे नेत्रांजन.

आलेले डोळे, लाली, खुपऱ्या, डोळ्यांतून पाणी येणें, डोळे खुपणें व सारा वगैरे सारखे विकार चार दिवसांत बरे होतात. किं: दर बाटली ०७ आ. बंगी करणावळ ०१ आ. शिवाय टपाल खर्च.

मूळव्याधीवर अद्भुत सर्बत

अवश्य अनुभव घ्या. रोग नवीन असल्यास एक बाटलींत काम होतें. रक्त पडणें, आंग सुज व ठणका, हीं तीन चार दिवसांत कमी होऊं लागतात. किं. दर बाटलीस रु. ३०४ बंगी करणावळ ०२ आ. शिवाय टपालखर्च. १ बाटली १२ दिवस पुरते.

मोड असल्यास हें सर्बत घेऊन शिवाय मलम घ्यावें लागतें. किं. दर डबी. ०८ आ. बंगी करणावणळ ०१ शिवाय टपाल खर्च.

आंवरक्ताच्या हगवणीवर गोळ्या.

सुमारें आठ दिवसांत मुरडा, आंवरक्त अगदीं बंद होऊन अन्न पचन होऊं लागतें. रोग अगदीं नाहींसा होतो. किं. दरएक २४ गोळ्यांचे डबीस १ रु. बंगी करणावळ ०१ आ. शिवाय टपाल खर्च.

शीत ज्वर व हिंवावर गोळ्या.

ह्या गोळ्यांची तारीफ करावी तेवढी थोडीच. यांचे सेवनानें कितीही दिवसांचे अगर कितीही दिवसांनीं येणारे हींव असो सुमारें चार दिवसांत हटकून बंद होतें. हिंवावर तर ह्या गोळ्यांची क्रिया केवळ जादू सारखी होते किं. दर १६ गोळ्यांचे डबीस १ रु० बंगी करणावळ ०१ आ. शिवाय टपाल खर्च.

परम्यावर उत्तम पाक

हा पाक तीन दिवस घेतला असतां लघवीची आग व तिडक नाहींशी होऊन पू वाहणें बंद होऊं लागतो. रोग नवीन असल्यास एक बाटली पुरे आहे. नाना तऱ्हेची रसायनी औषधें खाऊन ज्याचा परमा फार विकोपास गेला असेल त्याला दोन बाटल्या घ्याव्या लागतील. किं. दर बाटली ३ रु० बंगी करणावळ ०२ आ. शिवाय टपाल खर्च.

स्त्रियांच्या धुपणीवर कषाय ( काढा )

धुपणी तांबडी अगर पांढरी असो हा कषाय घेतल्या पासून सुमारें चौथे दिवशीं गुण दिसूं लागतो. गरोदरपणीं सुद्धां हा काढा देण्यास योग्य आहे. किं. दर बाटलीस २०४ रु० बंगी करणावळ ०२ आ. शिवाय टपाल खर्च १ बाटली १२ दिवस पुरते.

फारच उत्तम सालंम्रिश्री पौष्टिक पाक

स्त्री पुरुषांस सारखा गुणावह. ह्याचे सेवनानें अग्निमांद्य, जीर्णज्वर, अन्नद्वेष, अशक्तता, मेंदूची क्षीणता, हात पाय व कंबर दुखणें, व सरती वगैरे सारखे अनेक विकार ... लवकर ... व धातु शुद्ध ... होतात. हा पाक ... ल्यांत घेण्यास फारच प्रशस्त आहे. स्त्रियांना बाळंत होऊन दोन महिने झाल्या वर हा पाक अवश्य द्यावा. किं. दर शेर ३०४ रु० बंगी करणावळ ०२ आ. शिवाय टपाल ...

... कास श्वास दमा वगैरे ... विकार ह्या गोळ्यांनीं हटकून नाहींसे होतात. डांग्या खोकला व क्षयाच्या खोकल्यावर ह्यांचा फारसा उपयोग होत नाहीं. किं. दर २४ गोळ्यांचे डबीस १ रु० बंगी करणावळ ०१ आ. शिवाय टपाल खर्च.

हीं सर्व व आणखी सर्व रोगांवरील औषधें प्रांत वऱ्हाड, आकोलें येथें आमचे दवाखान्यांत विकत मिळतील. व्हया. पेबलनें ही पाठवूं. नाटपेड पत्र घेतलें जाणार नाहीं पत्ता सुवाच्य लिहावा. ह्या सर्व औषधाचें अनुपानांचे कागद औषधां बरोबर मिळतील कळावें.

नारायण चिंतामण
डाक्तर.


यांचे पडत असें. परंतु या पांच ... वा किंचित ...

... कळत नाहीं. ... ें. विहिरीं- खोकल्या या बद्दल किंवा पंडी पुढें कसें पासून दुसरेचं

साहेब फार ... काम पाहूं लागल्या पासून ... कांचा तंटा नाहींसा झाला राहून स्नेहानें परस्पर वागू लागली. आतां

हें पत्र आकोला येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

सहामाही ... २ ... ८
सालअखेर " ७ " ८
किरकोळ अंकास......................०४

नोटीशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
सेरे खेपेस .......०१

Per annum in arrears 7 "1Rs. 8 as.
Six monthly............3 " 8 as.
Sing le copy.......................................4 as.

Advertisements]
Below 10 lines...2Rs
per line over10...4as.
Repetition derline3as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.

VOL XXIII AKOLA MONDAY 21 JANUARY 1889 NO.3

वर्ष २३ अकोला सोमवार तारीख २१ माहे जानेवारी सन १८८९ इ० अंक३

CHIKALDA (BERAR) 5890
FEET ABOVF SEA LEVEL.

Notice of PROPERTY for SALE known as "Knowleswood" and "Netherwood" belonging to the Rev. H. W. Haden.

The property consists of Two Substantially built Bangalows, roofed with Galvanized iron and one thatched Bangalow, all three furnished, together with appropriate strongly built out offices roofed for the most part with galvanized iron together with lands covered by the same and adjoining in extent about 14 acres of which about 5 acres are planted with bearing coffee and the whole subject only to a ground rent of R. 1 per acre.

Offers for the above property are invited and should be sent before 10th February 1889 to.

Messrs. William Watson and Co.
28th Apollo Street
Bombay.

चिखलदरा ( वऱ्हाड ) समुद्राचे सपाटी पासून ५८०० फुट वर उंच.

नोटीस—रेव्हरंड एच. डब्ल्यु. हेडन यांयांचा "नोल्यसउड" आणि "नेथरउड नांवाने प्रसिद्ध असलेला माल विकावयाचा आहे.

या मालांत मजबूत बांधलेले दोन बंगले आहेत. त्यांवर ग्यालव्हनाइझड लोखंडी पत्र्याचे छप्पर आहे व एक गवती बंगला आहे. या तिन्हीं बंगल्यास मजबूत चांगल्या रीतानें बांधलीं आउट आफिसेस असून तीवर बहुतेक ग्यालव्हनाइझड लोखंडी पत्रें आहेत. शिवय ही व जवळची मोकळी जमीन एकंदर सुमारें १४ एकर आहे. यांतील पांच एकरात काफीची झाडे लावलेली आहेत त्यांस काफी आहे सव जमिनीस सारा दर एकरास फक्त एक रुपयाप्रमाणें आहे.

वरील माल ज्यांस घेणें असेल त्यांनीं ता० १० फेब्रुवारी सन १८८९ चे आंत आपण तो माल किती रकमेस घेण्यास तयार आहो हे खाली सही करणारास कळावें.

मेसर्स उलियम वाटसन आणि कंपनी.
२८ आपोलो स्ट्रीट
मुंबई.

नोटीस.

मंग्या वल्द जान्या माहार रहाणार पातूर सुभेदार तालुके व जिल्हे आकोलें यांसः—

नोटीस देणार कोती मर्द मंग्या माहार रहाणार खानापूर तालुके बाळापूर जिल्हे आकोलें इजकडूनः—

नोटीस देण्यांत येतें कीं. माझें लग्न तुझ्या बरोबर होऊन आज सुमारें २० वर्षे झालीं परंतु तूं होऊन कांहीं मजला एक वेळ ही घेऊन गेला नाहीं. नों पर्यंत मी ल्हान होती तों पर्यंत तुझ्या बापानीं मला घेऊन जावें, व तुझा बाप मरण पवल्यावर आज बरींच वर्षे झालीं असून मला तूं आपलें घरीं घेऊन जात नाहींस. आतां मी वयांत आल्यास सुमारें १० वर्षे झालीं. तेव्हां पासून तूं मजला नेऊन जन रीती प्रमाणें वागविले नाहीं. आतां मी आपलें बापाचें घरीं राहून माझें खाण्यापिण्या बद्दल माझे बापाचे मार्फतीनें २५ रुपये साल प्रमाणें १० वर्षांचे २५० रुपये कर्ज काढलें आहे ते रुपये देऊन मला [illegible] जावें. नाहीं तर मी हे रुपये फे[illegible] करितां दुसरा नवरा करीन. मग [illegible]वर तुझा कोणते ही प्रकारचा अगर नवरेपणाचा हक्क रहाणार नाहीं. हे २५० रुपये आणून देण्याची मुदत पंधरा दिवसाची तुजला दिली ह्या मुदतींत तूं २५० आडीचशे रुपये देऊन मजला घेऊन जावें. तसें न केल्यास मी आज तारखेस तुझ्या वर नोटीस दिली हीच फारकती समजावी. मग तुझें माझ्यावर कांहीं हक्क रहाणार नाहीं. ह्मणून दिली नोटीस कळावें. तारीख १५ माहे जानेवारी सन १८८९ इसवी.

( सही. )
कोती मर्द मंग्या माहार इचे
हातची निशानी बांगडी असे.

## पत्रव्यवहार.

ह्या सदरा खालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

मु० वाशीम १४-१-८९

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस

कृतानेक सा० नमस्कार विनंती विशेश थंडीचे मान कमी होत चालले हल्लीं चार पांच दिवसो पासून ती कमी झाली आहे साल मजकूरी उन्हाळा कमी होण्याचा रंग दिसतो ता० १२।१।८९ इ० रोजीं सक्रांतीचे मुहूर्तानें अग्नीनारायणानें आपले कामास आरंभ केला एक घर जळालें इतक्यावर संतुष्ट होऊन राहील तर बरा हल्ली येथें मे. (Sanatary Commissioner) साहेब बाहादूर यांची स्वारी आली आहे देवी काढण्याचा सपाटा चालला आहे. त्याचे शिरस्तेदार मिस्तर बापुराव यादव हे काम करण्याची फार मेहनत घेतात हे कमाशिनर साहेब येतात तेव्हांच देवीकाढण्याची गर्दी उडते. नेहमीं इतकी नसते. तेव्हां अशी कल्पना उत्पन्न होतें कीं एकदम इतकी मुलें कोठून उत्पन्न होतात देवीकाढण्या करितां नेहमीचे लोक येथें असतात. असें असतां इतकी मुलें शिल्लक कशी राहातात. कोण जाणें एकदोन दिवसांनीं साहेबांची स्वारी मंगरुळाकडे जाणार असें म्हणतात.

आमच्या गांवचे भूषण आमचे वकील साहेब मिस्तर यशवंतराव दिगे यांची स्वारी राष्ट्रीय सभेहून परत आली आतां हे वकील साहेब आम्हा अज्ञानजनांना व्याख्यान रूपानें राष्ट्रीय सभेची हकीकत कळवितील तर आम्हा अज्ञान जनांवर महतामहत उपकार होतील यांत संशय नाहीं. आम्हीं तिकडे जावें, समक्ष आपल्या डोळ्यांनीं राष्ट्रीय सभा पाहावी तर आमचे पाशीं सभेची माहिती करून घेण्याची अक्कल नाहीं, जाण्यास पैसा नाहीं; तेव्हां आमचे वकील साहेब तेथें झालेल्या गोष्टींचा स्वानुभवानें आमचे मनावर प्रकाश कारतील तर आम्ही समक्ष तेथें गेल्या पेक्षां ही अधीक लाभ मानु आमची आशा भंग करणार नाहींत अशीं आमची वाशिमस्थ लोकांची फार फार आशा आहे मे. पुसद कर तहसीलदार साहेब यांची स्वारी येथें आली होती ती तसीच परत गेली काम काय तें समजलें नाहीं. समजल्यावर कळवीन कळावें ही विनंती.

आपला. एक
" क्ष "

रा रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

मु० रिसोड तारीख १२-१-८९

[illegible]ानेक सा० न० वि० वि० आपल्या[illegible] फार दिवस झालें, रोष नसावा. मध्यंतरी थंडी फार चांगली पडत असे. परंतु या पांच सहा दिवसांपासून हवा किंचित बिघडली आहे. उन्ह फार कडक पडतें. पिकें चांगलीं आहेत. धान्याचे भाव मध्यम आहेत पाववसाच्या कमताईमुळें पिकें बिघडलीं नाहींत. परंतु सालमजकुरीं ऐन उन्हाळ्याचे दिवसांत पाण्याची काय वाट होईल हे कळत नाहीं. एव्हां पासून नाल्यांत पाणी नाहीं. विहिरींतून पाण्याचा पुरवठा कमी झाला या बद्दल लोकांना काळजी आहे. पहावे पुढें कसें होतें तें.

रिसोड येथें एक मोठें तळें आहे. तें बांधून बरेंच दिवस झालें. त्या तळ्यांतून पिकांना पाणी देत असतात, व प्रत्येक एकराच्या मागें अमुक रुपये पाण्या बद्दल सरकारास द्यावे असा ठराव असल्यामुळें लोक पाणी घेऊन त्याजवर शेतें पिकवितात. हें तळें गांवापासून फार लांब असल्यामुळें गांवांतील स्त्रीजन परिवार धुण्या करितां तिकडे जात नाहीं. त्यामुळें तळ्याचे पाणी निर्मळ असतें. तेथें सभोंवर झाडीं असल्यामुळें फारच शोभा दिसतें. तळ्यामध्यें पांढरे पक्षी झुंडीच्या झुंडी करून राहतात. त्यांना कोणी पाणकोंबडे ह्मणतात. कोणी बदके ह्मणतात. या पक्ष्याची शिकार करण्या करितां येथें गोर काय अधिकाऱ्यांच्या स्वाऱ्या येतात. यंदाची ख्रिश्चियन जयंती कित्येक अधिकाऱ्यानीं येथें केली. अधिकारी फिरावयास आले म्हणजे त्यांचा नबाबी थाट असतो असें लोक म्हणतात. परंतु असा प्रकार दुसरें कोठें असेल तर सांगवत नाहीं. परंतु आमचे येथें जे अधिकारी येतात ते अशा गोष्टी कधींहा करीत नाहीत. तें लोकांच्या हिता करितां झटतात. लोकांच्या सुखदुःखाची चौकशी करितात. त्यांच्या अडचणी दूरकरण्याचा यत्न करितात. मात्र कित्येक प्रसंगीं असें घडतें कीं जेथें स्वच्छता नसते तथील लोकांस प्रसंगीं कायद्याच्या कचाटांत येऊन दुःखें सोसावीं लागतात आतां स्वच्छता आरोग्यतेस जरूर पाहीजे. आरोग्यता राहावी अशा बद्दल सरकार फार झटते. तेव्हां आरोग्यतेचें मूळ बीज स्वच्छता ती राखण्या करितां सरकार यत्न करीत असते असो.

येथील शाळेची वार्षिक परीक्षा गेल्या महिन्यांत झाली. परीक्षे करितां ८३ मुलें दिलीं होतीं त्या पैकीं चौपन पास झालीं. इतकीं मुलें कधींच पूर्वीं पास झालीं नव्हती. असें लोक ह्मणतात हल्लींच्या हेड मास्तरांस येऊन सुमारें ८ महिने झाले इतक्या काळांत त्यांनीं चांगली मेहनत घेऊन शाळा चांगली सुधारली. मुलांची संख्या वाढविली त्यांच्या ताब्यांत पांचवी व सहावी अशा दोन इयत्ता होत्या. त्या त्यांनीं चांगल्या प्रकारें शिकाविल्या. एक क्षणभर सुद्धां बिचाऱ्यानें विश्रांती घेतली नाहीं. शाळेंत वेळेवर येणें, सर्व वर्गां कडे लक्ष्य देणें, सर्व मास्तरांना व मुलांना चांगल्या रीतीनें वागविणें, मुलांना चांगल्या रीतीनें वागविणें, मुलांच्या आरोग्यते बद्दल काळजी वहाणें, सर्व लोकांना विद्येची गोडी लावणें, लोकांशीं स्नेहभावानें वागणें, त्यांची प्रीति आपणा कडे ओढून घेणें वगैरे गोष्टीमध्यें हे मास्तर साहेब फार निष्णांत आहेत. हे येथें येऊन काम पाहूं लागल्या पासून येथें मास्तर लोकांचा तंटा नाहींसा झाला. सर्वांमध्यें ऐक्य राहून स्नेहानें परस्पर वागण्याची सर्वांना सवय लागली. आतां या मास्तरांमध्यें एक कांटा राहिला आहे परंतु एकटा करतो काय? तोही थोडक्या दिवसांत निघेल यांत संशय नाहीं. हल्लीं सहावे इयत्तेंत मुलें असावी तितकीं नाहींत तेव्हां ती इयत्ता बंद होते किंवा कसे याची भीती लोकांना उत्पन्न झाली आहे येथें विद्येची गोडी नाहीं. येथें व्यापारी लोकांची वस्ती फार. त्यांना चौथ्या इयत्ते पलीकडे अभ्यासाची गरज नाहीं, तेव्हां चौथी इतत्ता येथें चांगल्या रीतीनें राहूं शकते. पांचवी सामान्यपक्षीं राहूं शकेल. सहावी असणें ह्मणजे मास्तराला नेहमीं काळजीच वहावी लागते. ह्या सर्व गोष्टी वरिष्टांना बहुत दिवसां पासून ठाऊक आहेत तेव्हां आतां पुढें सहावीचें काय होतें पहावें.

येथें मध्यंतरी गोरक्षक सभेची बरीच तारांबळ झाली होती. परंतु अलीकडे सर्व लोकांचें लक्ष्य व्यापाराच्या कामीं लागल्या मुळें ह्या कामाकडे अर्थात दुर्लक्ष्य व्हावयाचेंच. व्यापाराची घाई कमी झाल्यावर पहावें कसें काय होतें तें. नाहीं तर कोणत्याही कामीं आरंभशूर हें आमचे नांवा मागचें विशेषण आहेच तयार!!

आमचे गांवा पासून कुणीकडे ही जाण्यास सडक नाहीं. आमचा गांव व्यापाराच्या संबंधे फार प्रसिद्ध आहे. वाशीम जिल्ह्यांत पेठेचा गांव पहिल्या वर्गापैकीं आहे असें ह्मटले तरी चालेल. असें असतां येथें सडक नसावी हे मोठें दैन्य आहे. पर्जन्यकाळ गेल्यावर महिना दोन महिन्यांनीं चिखल कमी होऊन जेव्हां रस्ते सुकतात तेव्हां गाड्या चालूं होतात. उन्हाळ्यांत काय तो व्यापार चालतो. पाऊस पडला कीं सर्व बंद होते. परंतु अशी सुवार्ता कानीं पडते कीं, येथून मालेगांव पर्यंत शिरपुराकडून सडकेचा रस्ता होऊन आकोला, हिंगोलीच्या सडकेस मालेगांवांस मिळणार असें झाल्यास येथील व्यापार अधिक वाढेल; सर्व वर्षभर व्यापार करण्याची सोय होईल. येथून वाशीमास जाण्यास जरूर सडक पाहिजे आहे. परंतु ती पूर्ति होईलसें दिसत नाहीं कारण फक्त ह्याच रस्त्यानें जाण्याचीच अडचण पडते. व्यापाराच्या बाबतींत आकोल्याशींच फार काम पडते. मालेगांव पर्यंत जर सडक झाली तर ही अडचण दूर होईल. कळावें. ही विनंती.

आपला

रिसोडस्थ.

---

वऱ्हाडसमाचार.

मिती पौष वद्य ९ शके १८१०

कोणताही देश सुधारत जाण्यास त्याची स्थिति सर्व प्रकारें सुधारली पाहिजे. केवळ एकाच दिशेनें सुधारणा केली ह्मणजे देश सुधारतो असें होत नाहीं तर सर्व बाजूनें सुधारणा झाली पाहिजे व असें झालें तरच देश उन्नतीस येणार आहे. हिंदुस्थान देश युरोपांतील सर्व देशांपेक्षां जाज मागें आहे तरी सुधारणेच्या मार्गाला आहे असें ह्मणण्यास कांहीं बाध येणार नाहीं आज हिंदुस्थानला जी स्थिति प्राप्त झाली आहे ती केवळ इंग्रज सरकारच्या अमलामुळें व त्यांनीं दिलेल्या विद्याज्ञानामुळें प्राप्त झाली आहे व आणखी कांहीं दिवस पर्यंत आमच्या दयाळू इंग्रज सरकारानें आमच्या विद्यावृद्धी करितां आज पर्यंत जी खटपट केली व जो खर्च केला तशीच खटपट व तसाच खर्च जर पुढें चालूं ठेवला तर आमचा हा देश इतर सुधारलेल्या देशाच्या केवळ बरोबरीचाच येईल इतकेंच नाहीं तर किंबहुना पुढें हो जाईल

आजपर्यंत बहुतेक इंग्रेजी पत्राचा व इतर नेटीव दृष्टयाचा असा आक्षेप होता कीं नेटिव लोक केवळ राज्यकीय स्थितीतच काय ती सुधारणा करण्याच्या भरीस पडले आहेत. व सामाजिक सुधारणे सारख्या महत्वाच्या गोष्टीकडे अगदीं कानाडोळा करीत आहे व ही सामाजिक किंवा धार्मिक सुधारणा केल्या शिवाय त्यांनीं राज्यपद्धती सुधारण्याच्या खटपटीस लागणें ही मोठी चूक आहे. परंतु हा आक्षेप अगदीं व्यर्थ आहे. नेटीव लोक समाज सुधारण्याच्या कामाला राज्यस्थिति सुधारण्यांपेक्षां ही जास्त महत्व देत आहेत. व त्याजबद्दल कित्येक विद्वानांची खटपट ही आज बरेच दिवसा पासून जारीने चालू आहे समाज सुधारणें हें काम आजकाल फार जरूर आहे असें प्रत्येक मनुष्याला वाटू लागले आहे व याजबद्दल कांहीं व्यवस्था झाली नाहीं तर समाज स्थिति कोणच्या अवस्थेला जाईल याची कांहीं कल्पना करवत नाहीं. हल्लींच्या काळीं समाजांत दोन प्रकारचे लोक आहेत एक तर अलीकडे विद्वान व दुसरे जुन्या काळचे धार्मिक व ह्या प्रमाणें एकाबर दुसऱ्याचा एगडा असल्यानें समाज बिघडण्याची कांहीं भिती नव्हती. परंतु यापुढें समाज नुसत्या अलिकडच्या विद्वानांचा बनणार आहे व ही पुढील विद्वान मंडळी कोणच्या मार्गाला जाईल याची फार भिती उत्पन्न झाली आहे कारण या मंडळीला धार्मिक किंवा सनातन पुराणांतील गोष्टींचे शिक्षण न मिळाल्यामुळें यांची निती व वर्तन क्रम ही बिघडण्याचा फार संभव आहे. हल्लींच्या विद्वान मंडळीची धर्माबद्दल जरी अनास्था आहेतरी लहानपणीं त्यांच्या आईबापाकडून किंवा पुराणिकाकडून वगैरे जो उपदेश मिळाला आहे किंवा त्यांच्या बर्तनांत त्यामुळें जो ठसा उमटला आहे तो नाहींसा होणें फार कठीण आहे. कोणचे ही धार्मिक कृत्य स्वतः करावें असें जरी हल्लींच्या विद्वानांच्या मनांत येत नाहीं तरी देखील आपल्या धर्माविरुद्ध किंवा नीती विरुद्ध जाण्याची त्यांची प्रवृत्ति ही होत नाहीं परंतु नवीन होणारा समाज आपल्या पुरातन पुराणाला किंवा धर्म कृत्याला अनाभ्यास असल्या का[illegible] कोणच्या दिशेस वाहवेल अशी भिती वाटून कित्येक विद्वान मंडळींनीं असा विचार काढला आहे कीं, शाळांतून किंवा इतर ठिकाणांतून मुलांना आपल्या शास्त्राची व पुराणाची माहिती करून द्यावी. व ह्या करितां सरकार जरी पैसे देणार नाहीं तरी लोकांनीं थोडे बहुत पैसे देऊन आपल्या मुलांना पुराणोक्त गोष्टींचे व धर्माचे शिक्षण द्यावें. अशाबद्दल ऑनरेबल महादेव गोविंद रानडे सारख्या विद्वान गृहस्थांनीं विचार करून हा मार्ग शोधून काढला आहे. सदरहू विचार फार स्तुत्य नाहीं असें कोणाच्यानें ही ह्मणवणार नाहीं. यूरोप सारख्या मोठ्या सुधारलेल्या देशांत देखील धार्मिक शिक्षणाची जरूरी वाटते आहे व ते इतर शिक्षणा बरोबर सर्व शाळांतून योग्य वेळीं दिले ही जात आहे. समाजांतील इतर पुष्कळ गोष्टी बद्दल सुधारणा व्हावी असें पुष्कळ दिवसांपासून वाटते आहे परंतु ती कोणच्या मार्गानें व्हावी याचा मात्र विचार होता तरी रानडे आदिकरून विद्वान मंडळींनीं असा विचार केला आहे कीं दरसाल राष्ट्रीय सभे प्रमाणें सामाजिक सभा एक वेळ भरत जावी व ती ज्या ठिकाणीं व ज्या वेळेस राष्ट्रीय सभा भरते त्या ठिकाणीं व त्याच वेळेस भरावी कारण असें केल्यानें पैसा ही कमी लागून लोकांना त्रासही कमी पडणार आहे गत वर्षी ही सभा अलाहाबादेस लाथरक्यासल मध्यें तारीख २९ माहे डिसेंबर सन १८८८ इ० रोजीं भरली त्या वेळेस निदान ९०० शें पेक्षां जास्त लोक तेथें हजर होते त्यांत बहुतेक हिंदूच होते. अध्यक्षस्थान ऑनरेबल मि. रानडे यांनीं स्वीकारलें होतें. ते ह्मणाले कीं ह्या सभेच्या पोट सभा प्रत्येक प्रांतोप्रांतीं स्थापाव्या व प्रांतीक सभेंतील मंडळींनीं वर्षभर काय काय कामें केलीं व तीं कामें करण्यास त्यांना कोणच्या अडचणी आल्या व त्या कशा दूर केल्या हें सांगण्यास त्या मंडळीस तयार असलें पाहिजे व असें केल्यानें एकमेकापासून लांब परंतु एकाच कामांत खटपट करणाऱ्या मंडळीच्या हकिकती समजून परस्पराच्या कृत्यास परस्परापासून मदत होणार आहे व परस्परामध्यें ऐक्यता उत्पन्न होऊन सामाजिक सुधारणेचा गाडा सर्वांचे विचारानें चालला जाणार आहे व आणखी कांहीं वर्षेपर्यंत ह्या सभे कडून दुसरी कांहीं विशेष खटपट होईल असें मला वाटत नाहीं व तसें होणेंही इष्ट नाहीं या शिवाय ऑनरेबल रानडे असेंही ह्मणाले कीं कांहीं वर्षां पूर्वीं ह्या देशांत एकच भाषा व एकच धर्म असल्या मुळें इतर देशा प्रमाणें हिंदुस्थानवासी लोकांचे एकच राष्ट्र होतें. परंतु तो काळ जाऊन हल्लीं त्याच्या ऐवजी निदान चारशेंहून कमी नाहींत इतक्या जाती बनल्या आहेत व त्याप्रमाणें सर्वांच्या रीतीभाती व भाषाही पण अगदीं निराळ्या झाल्या आहेत व तणें करून प्राचीन काळीं असलेली ऐक्यता जाऊन याच्या ऐवजी परस्परांत भिन्नता प्राप्त झाली आहे. हल्लीच्या स्थितींत ज्ञान प्राप्ती सर्वांस सारखी नसल्या मुळें सभेंपुढें कोणच्या गोष्टी आणता येत नाहींत व त्याबद्दल विचार ही करितां येत नाहीं. अशा प्रकारें अध्यक्षांचे बोलणे झाल्यावर कित्येक मंडळींनीं आपल्या आपल्या प्रांता करिता ह्या सभेचे सेक्रेटरी होण्याचे कबूल केलें त्यांत वऱ्हाड प्रांता करितां रावसाहेब देवराव विनायक ह्यांनीं सेक्रेटरी होण्याचे कबूल केलें आहे या नंतर लोकांची सामाजिक स्थिती सुधारण्या करिता काय काय उपाय योजावे याज विषयीं विचार चालला होता त्यांत पुष्कळच सूचना झाल्या त्यांत एक दोन सूचना फारच विचार करण्या सारख्या आहेत. सिंध प्रांतातील मंडळींनीं जी सूचना केली ती फार चांगली असून साध्य होण्या सारखी आहे.

कांहीं दिवसांपूर्वी सिंध प्रांतातील मंडळींनीं असा विचार केला कीं अलिकडे विद्वान लोक अमक्या अमक्या प्रकारें समजाची सुधारणा करावी अशा बद्दल मोठ मोठी व्याख्यानें देतात, सभा भरवितात व मोठ मोठाले ठराव करितात. परंतु त्या प्रमाणें स्वतःवर एखादा प्रसंग आला ह्मणजे पुराणांतली वांगी पुराणांत ठेवून आपल्या उक्तीस बोष लावितात. व लोकां मध्यें आपण पत्करलेल्या महत कार्याचा उपहास मात्र करतात. एवढ्या करितां त्या मंडळींनीं असा ठराव केला कीं सुधारक ह्मणविणाऱ्या लोकांच्या एक तर वृथा बलगना बंद कराव्यात किंवा त्या प्रमाणें वागण्यास तरी त्यांना लावावें. एवढ्या करितां त्यांनीं हिंदुस्थान सरकारच्या उपदेशानें एक मंडळी स्थापन करून ती मंडळी सन १८८२ चा आक्ट नंबर ६ त्यांतील कलम २६ प्रमाणें रजिस्टर करून टाकिली. ह्या मंडळीनें जे कांहीं नियम केले आहेत त्यांत एक नियम असा आहे कीं या मंडळींतील जर कोणी आपलें वचन पाळणार नाहीं तर तो दोषी ठरून मंडळी ठरवेल तो दंड देण्यास पात्र होईल. व ह्या मंडळीनें ठरविलेला दंड दिवाणी कोर्टाच्या मार्फत वसूल केला जाईल. ह्या मंडळीचा समाज सुधारण्याचा जो मार्ग आहे त्याज बद्दल सविस्तर माहिती मि. दयाराम गिडुमल बी. ए. एल एल बी अमदाबाद येथील असिस्टंट जज्ज यांनीं पुस्तक रूपानें प्रसिद्ध केली आहे तरी त्याजबद्दल होईल तितकी माहिती संक्षेप रूपानें वाचकांस समर्पण करूं.

( पुढें चालेल. )

---

आमच्या दयाळू सरकारचा आपणास सर्व साधारण असा नियम आढळून येतो कीं, कोणतेंही एखादें काम शेवटास न्यावयाचें असल्यास त्यांत त्याचें कांहीं तरी कारस्थान असतेंच. आह्मा हिंदु लोकांशीं अशीं कारस्थानें लढविण्याचें त्यांस अलीकडे फारच सोपें वाटूं लागलें आहे. आणि ही कारस्थानें योजण्याच्या युक्तीचें बाळ कडु सरकारच्या सर्व अधिकाऱ्यांस मिळालें आहे असें दिसून येतें उदाहरणार्थ. मुंबई सरकारच्या मनांत इलाख्यांतील हायस्कुलांच्या फीचे दर वाढवावयाचे होते परंतु हेच दर वाढविण्याचा त्यांनीं जर एकदम हुकूम सोडला असतां तर लोकांत बरीच चळवळ होऊन ते फार नाखुष झाले असते, हें लक्षांत आणून व 'नाक दाबल्या शिवाय तोंड उघडत नाहीं' ह्या तत्वास अनुसरून पुणें, नगर इत्यादि मोठमोठ्या ठिकाणचीं हायस्कुलें बंद करण्याचें हुकूम पाठविले इतकेंच नाहीं तर नवीन मुलें शाळांतून न घेण्याच्या नोटिसा प्रसिद्ध करून त्या शाळांतील मास्तर लोकांच्या इतर ठिकाणीं सोई करण्याच्या खटपटी सुरू केल्या. इतकी चळवळ करून सोईस्कर बरोबर पूर्वीच अनुमान करून ठेवल्या प्रमाणें लोकां कडून सयुक्तिक कारणें दाखवून हायस्कुलें बंद न करण्या विषयीं अर्जावर अर्ज रवाना झाले. व ह्या अर्जास 'सरकारनें हायस्कुलें अजी बंद करण्याचा बेत रहीत केला आहे तरी पण खर्चाच्या अडचणीमुळें फीचे दर वाढविणे भाग होईलसें दिसतें.' असें उत्तर दिलें व तेवढ्यातच आमचे लोक आनंद मानून स्वस्थ बसले यांत नवल तें कोणतें पहा काय चमत्कार आहे! ज्या लोकांनीं फीचे दर वाढविले ह्मणून खाळपी माती वर करून सोडली असती व सरकारास कित्येक दिवस चैन पडूं दिलें नसतें त्याच लोकांनीं 'प्राणावरचें शेपटीवर गेलें' असें समजून व सरकारचे आभार मानून स्वस्थ रहाणें ही केवढी आश्चर्याची गोष्ट समजली पाहिजे. अथवा ह्यांत आश्चर्य तें कसलें, आमच्या लोकांच्या लक्षांत ह्या खुब्या अजून हो येत नाहींत असें नाहीं परंतु करणार काय! 'सत्ते पुढें शहाणपण चालेल तेव्हांना!'

---

The Berar Samachar

MONDAY JANUARY 21, 1889.

## PUBLIC PROSECUTORS FOR BERAR.

A necessary adjunct of a good Judicial system is the public prosecutor.

In criminal cases when the accused is defended by able counsel it is always necessary in the interests of Justice to have some responsible lawyer to represent the prosecution. Whatever the efficiency of the Police authorities in detecting crime, they can never be expected to conduct criminal cases before magistrates as efficiently as lawyers. In the absence of persons appointed to prosecute on behalf of government, the Police superintendent or his assistant has to be appointed to conduct cases; nay sometimes subordinate magistrates have to leave their magisterial functions to be confronted with counsel for the accused. In many cases it is well known that Justice suffers on this account. It would undoubtedly be a great help to the Police to put their case before the magistrate exactly as it is necessary to do so. In the sister Presidencies there are public prosecutors and the office though it existed in Berar once exists no longer at the present time. Under the new Judicial scheme, it would be necessary to have the office revived; and indeed we hear that something of the sort is already in contemplation for Amraoti District and we have also heard that Mr. Leach a gentleman who practised at Hyderabad and who has lately come to Amraoti to practise there, is to be selected for the post to be newly created. It seems rather curious that the revival of the office is coeval with the coming of Mr. Leach. But we could never persuade ourselves to believe that the office would be given to Mr. Leach. A retainer of a hundred or two besides fees in cases, is the least consideration in the matter of appointing a gentleman like Mr. Leach. The office is looked upon more as a recognition of merit and people covet it more for honor than the perquisites of the office. The members of the local Bar ought to be preferred and we have no doubt that if the office is going to be created our present Judicial Commissioner will not fail to make a Judicious selection. We have reason to be proud of the Bar at Amraoti and there are many worthy members of the Bar who would consider it an honor to be appointed to the office of a public prosecutor. In point of merit or in point of length of time for which they are practising, there are many members of the Bar whose claims would decidedly be better to those of Mr. Leach to the office. Of course it lies with government to make the appointment, and the higher authorities will naturally be guided by the recommendations of the Judicial Commissioner. We fully trust that the selection would be satisfactory and that we may have no occasion to make any unpleasant though true remarks regarding the appointment. With Col. Mackenzie at the head of the Judicial Department, we are not at all apprehensive about a proper selection for the office if one is going to be created.

## AGRA AND ITS NOTED SCENES.

(Communicated)

As you near Agra by the railway, you see from a distance the splendid pile well known as the Taj Mahal. Of the many cities in Northern India, Agra is a place which a tourist ought to visit. It contains the grandest remains of the magnificience of the Moghul rule in the highest meridian of its glory. The city itself is nothing but for the rare buildings that it owns. Substantial but irregular buildings with a dingy rows of streets are the bane of Agra as of any other ancient city Northern India except Jaypur. The first thing to go and look at is the 'Jamma Musjid' a grand four cornered building consisting of a magnificient court yard surrounded by Marble buildings and of a place of worship all of Marble and supported by arches. The Marble work here is grand but the style of architecture is very simple. The next place to see is the Agra Fort, which commands a very enviable position. It was once used both as a fortress and as an imperial residences. The ramparts are surrounded with a ditch with contrivances to let in water from the river Jumna which lies in front of it. A part from its merit as a stronghold, its value consists in the many architectural buildings which it holds within the walls. The 'Moti Musjid' or pearl Mosque is a building of pure marble and meant for the use of Emperors and noble men of the city. There is also the 'Dewani Aam' and the 'Dewani Khas' or the public and the private audience hall. The architecture here is more superb and the gold work intended to decorate the inside of the roofing although in a very much dilapidated state now, betokens the state of perfection to which that art had attained in the time of the Emperors. The marble work is all inlaid with red and blue and copper colored marbles. These marbles of various colors are chiselled into the most beautiful foliage shapes and look very beautiful indeed on a ground work of pure white marble. The actual royal residence which is now crumbling into dust pice by pice is full of all kinds of places appropriate to imperial use; a broken sort of building is pointed out as once the residence of Jodh Bai one of the Hindu wives of that great Emperor Akbar Shah. Jodh Bai was the daughter of the king of Jodhpur and had been married by Akbar as a farsighted politician. The building together with the Mandir of Krishna where Jodh Bai used to worship her Hindu Gods, is said to have been destroyed by that great destroyer Aurangzebe. There is also a bath full of small mirror work provided with hot water and cold water cisterns and baths of marbles in which you could get yourself immersed up to your neck. Of course the baths are now out of order. After leaving the fort the Sikandra is the next building to go to. It is about 6 miles from the city and is the tomb of the great Akbar Shah. The architecture here is splendid; all is marble inlaid with colored marbles and one gate out of four which has now been repaired by Government will itself speak to the high kind artistic excellence that prevailed at the time it was built.

Art is seen at its best in the 'Etmad uddawlah' a building holding a tomb of one of the Vazirs of the Emperor. The designs are exquisite and the marble worked up so marvellously that the very complexity of the workmanships makes one doubt if it was real marble; and yet marble it is and nothing else. The guides who accompany you are fond of telling stories about diamonds and rubies and emeralds that once stood inlaid in the white marble and which were taken away by the ruthless Bharatpoor Jat prince when he conquered Delhi; and about marauding Marhatta who put lighted torches to the roofing to get the gold which glittered there. The best of all is of course the Taj Mehal or as it is called Taj Bibika Roza. It is the tomb of Mumtaz Begum. It occupies a unique position on the banks of the Jumna. The whole appears as if it was raised even yesterday. It is a magnificient array of white marble that you see around you; your walls are marble your hair cases marble the ground under your very feet is all marble. The spotlessness of the stones, the exquisite workmanship and designing are so very impressive that one feels hardly satisfied by gazing at it for hours. The stones of the tombs are yellow stones and inlaid with Persian letters in colored marbles. A carved railing of pure marble surrounds the tomb and there is the very best of carving and inlaid floral work. The designs here are oriental; and it shows that either foreign designs or foreign workmen must have helped to create the magnificient pile. The main building is surrounded by a row of splendid marble pillars which give the main building a very grand appearances from outside. The Tag is really one of the wonders of the world.

चुकीची दुरुस्तीः—तारीख ७।१।९९ चे अंकांत तिसरे पानावर जी नोटीस दिली आहे ती मध्यें पांच इसमाचे ठिकाणीं ६ इसम व तारीख २९ चे ठिकाणीं २३ असें वाचावें.

## वऱ्हाड.

क्यापटन् आर. व्ही. ग्यारेट, अ. क. यांस फर्स्ट क्लास माजीस्त्रेटचे अधिकार मिळाले.

मि. सुरज नारायण, अ. क. आणि फर्स्ट क्लास माजिस्त्रेट, यांस क्रि. प्रो. को कलम १९१ भाग, सी. प्रमाणें अधिकार मिळाले.

मे. कमिशनर साहेब यांची स्वारी दोन तीन दिवसांत येथें येणार म्हणून समजतें.

कर्नल स्पान्स्की डें० क० बुलठाणें, हे लवकरच रजेवर जाणार व त्याचे जागीं मि आवड स्पे० अ० क. व्हातील असें म्हणतात.

मि. बळवंत बापुजी तहसीलदार मंगरूळ यांस सेकंड क्लास माजिस्त्रेटचे अधिकार मिळाले.

मि. गोविंद राव आया, गणेश बापुजी तहसिलदार, मि. मेन उमरावती, यथलि डे. क. चे हेडक्लर्क आणि मि. ओग्रेडी, रे. पो. इन्स्पेक्टर यांस ए. अ. क. नेमणार अशीवदंता आहे.

मे. जुडीशियल कमीशनर साहेब सेशन मुकदम्या करितां ता. १४ रोजी आले होते ते ता० १७ रोजी परत गेले.

सेशनच्या मुकदम्यांची चौकशी चालली असतां केद्यास दोन वेळा फेपरे आले त्या मुळें बरीच वेळ चौकशी बंद पडली शेवटी सीव्हील सरजनच्या व इतर लोकांच्या साक्षी वरून असें ठरले कीं गुन्हा करते वेळेस आपण काय करतो आहों व याचा परिणाम काय होईल हे कैद्यास समजत नव्हते सबब केलेल्या कृत्या बदल तो जबाबदार नाहीं एवढ्या वरून त्यास जज्ज साहेबांनीं दोष मुक्त करून वेड्याच्या आस्पितालांत पाठविले. सेशन मुकदम्या शिवाय दोन फौजदारी आपिले तारीख १६ रोजीं नेमिली होती त्या दोन्हींत ही कनिष्ट कोर्टानें दिलेल्या शिक्षा सेशनकोर्टानें कायम ठेवल्या. एक अपील कान्हेरीच्या पांड्याचें होतें व दुसरें अन्वी येथील पाटील पांड्यानी केलेलें होतें पहिल्यांत सरकारी नोकरानें पाटील व पांड्यांनीं ३० रुपये लांच दिल्याबद्दल आरोप होता व दुसऱ्यानें सरासरी ३॥ रुपया शिलक खाल्याचा आरोप होता आज काल हे गुन्हे फार होतात एकट्या आकोल्या जिल्ह्यांत या वर्षी ५१६ मुकदमे अशा प्रकारचे झाले. व ते लोक आपल्या वडिलार्जित वतनास मुकले. सदर्हु प्रमाणेंच कान्हेरीकराला व अन्वी करालाही आपल्या वतनाची कायमची रजा घ्यावी लागेल. यावरून इतर लोक उदाहरण घेतील काय! आज काल नवे वतन मिळणें तर कठिण. आहेच परंतु वडिलार्जित रक्षण करणें हेंही कांहीं सोपें नाहीं.

## नोटीस.

नोटीस खाली सही करणार इनकडून सर्वत्र रिनको लोकांस कळविण्यांत येत आहे कीं माझा नवरा नामें विठोबा रामजी तारकशी यांच नांवानीं पातूर शेखबाबू येथें सावकारी घेणें देणें असून तो मरण पावल्यावर त्याजला पूर्वीच्या बायकोची मुलें दोन आहेत. त्यातील वडील मुलगा नामे मारोती व विठोबा हा माझा नवरा जो विठोबा रामजी तारकशी याचे नांवचे दस्तऐवज माझेजवळ असोन त्या दस्तऐवजांत लाहीलेले रुपय प्रमाणें रुपय रीनकोंनी देत नसोन त्या वडील मुलास फारीक देऊन कमि रुपये देऊन त्याच्या सहिच्या पावत्या घेणें सुरू केल्याचे मी ऐकिती. व दस्तऐवज माझेजवळ आहेत. तेंव्हां सर्व रीनको लोकांस कळविण्यांत येत आहे कीं. ज्या ज्या लोकांस रुपय देणें कर्ज असेल त्या लोकांशी माझे जवळ येउन हिशोब करून रुपये देऊन दस्तऐवज परत घेउन जावें या प्रमाणें कोणी न करितां माझे संमती वाचून त्या मुलाचे सहीची पावती घेउन रुपये दील तर ती पावती मी कबुल न करितां पुन्हा दुसऱ्यानी रुपये घेतले जातील कारण कीं माझी नुकसानी होण्याकरितां रीनको लोकांनीं पावत्या घेणें सुरू केल्या आहेत माझे समती वाचून त्याजला देऊ नये कळावे ता० १८।१।९६०

(सही)

रंगुबाई तर्फे कुल मुत्यार लक्षपण तुकाराम राहणार पातूर सेखबाबू.

## वर्तमानसार.

लंडन म्युनिसिपालिटीच्या स्थापनेस ७०० वर्षे झाली.

यंदा युनिव्हरसिटीस एक लाख रुपयांच्या नवीन देणग्या मिळाल्या.

रशियांतील बाल्टिक समुद्र व श्वेत समुद्र यांच्या मध्यें कालवा काढण्याचा विचार आहे.

पेशावरचा एक बातमीदार असें कळवितो कीं —नवशेरची छावणी २९ मैलावर आली आहे. पलटणांत एका सोल्जरानें प्राणघात करून घेतला. पाहाडांतील लाकडें कापून विक्री करणारावर कांहीं लोकांनीं चाल करून त्यांस लुटलें. खैबरकडील पोलिटिकल आफिसर कर्नल बारबस्टन त्यांस पकडण्याचे तयारींत लागले आहेत. या खेबर हद्दींत महंमद नावच पठाणाचा खुन झाला आहे खुनी लोक पकडले आहेत. जर आणि जोरू एवढ्या साठीं हे भयंकर परिणाम दृष्टीस पडतात.

सिकीमच्या प्रकरणांत लढा पडला आहे. तो प्रदेश जिंकला, परंतु टिबेटचे सरकार त्याजवर आपली सार्व भौमसत्ता असावी असें ह्मणतें आमचे सरकार तें संस्थान आमच्या सत्तेखालीं आहे असें ह्मणतें. तूर्त बोलणीं बंद पडलीं असें समजतें.

बेंगाल नागपूर रेल्वेचा रायपूर पासून बिलासपूर पर्यंतच्या भागावर गाड्या येण्याची सुरवात गेल्या गुरूवार पासून झाली.

पेशावर येथील तारेवरून असें समजतें कीं इशाकखान यांणी पुन्हा बरीच मोठी फौज जमविली आहे व तिला कवाईत वगैरे शिकवून तयार केली आहे. अमीर अबदुल रहिमान पासून ती तीस कोसांच्या अंतरावर आहे. व बर्फ वितळण्याची वाट पाहात आहे. त्यास रशिया कडून द्रव्य साहाय्य मिळत आहे असा संशय आहे.

मि. सोराबजी माणिकजी ह्या पारशी ग्रहस्थास गायकवाड सरकारांनीं आपल्या सैन्यांत लेफ्टनेंटची जागा दिली.

रशियाच्या तारेवरून असें कळतें कीं तेथें एक तारा पडला त्यामध्यें कांहीं हिरे सांपडले.

सर वुइलियम हंटरहे लवकरच हिंदुस्थानांत येऊन जाणार आहेत.

— वैतरणा आगबोटीच्या फंडास गायकवाड सरकारानें १२०० रु० दिले.

सु० प०

तिसऱ्या वर्गाच्या आगगाडींतील उतारूंच्या कांहीं गैरसोई दूर करण्याचा विचार खुद्द गव्हरनर जनरलच्या मनांत घोळत आहे असें ऐकून आतां खचित त्या दूरदैवी उतारूंचे नशीब खुलण्याची वेळ आली असें ह्मणण्यास हरकत नाहीं. प्रत्येक डब्यांत शौचाची व लघवीची सोय, मेंढरांप्रमाणें न कोंडतां पैस जागा देण्याची तजवीज व उतारूशीं सौम्य तऱ्हेनें रेल्वे नौकरांनीं वागण्या बद्दलची खबरदारी घेतली ह्मणजे तूर्त पुष्कळ झालें ह्मणण्यास हरकत नाहीं. पण मागें मुंबई सरकारानें ह्या उतारूंचा विचार करण्याचा आव घालून बाहेर काढलेल्या हास्यास्पद ठरावाप्रमाणेंच ह्याही विचाराचे न होवो ह्मणजे झालें. पहिल्या व दुसऱ्या क्लासाच्या उतारूंपेक्षां शौचाची व लघवीची गरज तिसऱ्या क्लासालाच फार असते हें कोणाही सामान्यजनांस कळेल पण तें तत्व रेल्वेवाल्यांस मात्र कळत नाहीं याला इलाज नाहीं.

सरकारी कामदारांनीं आपल्या ताब्यांतल्या लोकांपासून मेवामिठाई व फळफळावळ ही घेऊं नये असें सरकारानें नुकतेंच एक सरक्युलर काढलें आहे असें सांगतात.

आस्ट्रेलियांतील एका प्रांतांत रानससे मनस्वी झाल्यामुळें ज्या विषाच्या योगानें कोंबडी बदकं वगैरे गृहपक्षी न मरतां ते ससे मात्र मरतील, असें विष जो शोधून काढील, त्यांस पंचवीस हजार पौंड त्या प्रांताचे सरकारानें बक्षीस देऊं केलें आहेत.

कोचीन येथें मोठी आग लागून चार कंपन्यांचे तेलाचे स्टोअर खाक झाले असें कळतें. बंदरांत फत्तेमार होती तींत आगीचा उगम होऊन वाऱ्याच्या जोरानें गांवांत तिचा फैलाव झाला. शिवाय शंभर एक घरेंही जळलीं. २९–३० लाखांचें नुकसान झालें.

लार्ड लांन्डसडौन हे येत्या एप्रिल मध्यें दिल्ली येथें दरबार भरविणार आहेत.

पुढील महिन्यांत हैद्राबादचे दिवाण व्हाईसरायसाहेबांस कलकत्यास भेटणार आहेत.

पुढील राष्ट्रीय सभेंतील भाषणें वगैरे व्यवहार तिची बैठक असेल तेवढ्या दिवसांत इंग्लंडांतील धुरीण पत्रकारांस तारेनें कळवावें असें घाटत आहे. याबद्दल सुमारें ४००० रु० चा अदमास झाला आहे. क०त०

शेतकऱ्याच्या स्पेशल जज्यांच्या व सबजज्जांच्या जागा कमी करणार व रा० ब० रानडे यांस मुंबईस स्मालकाज कोर्टाचे जज्ज नेमणार अशी बातमी बाहेर आली आहे असें केसरी वरून कळतें.

गोवधाची बंदी—कोचीनच्या महाराजांनी महाराणी साहेबांच्या हुकुमानें आपल्या राज्यांत गोवधाची बंदी केली आहे असें आनंद दायक वर्तमान समजतें. गु० सू०

दिल्ली कोट्राई रेल्वे चालू महिन्यांत पुरी होईल असें ह्मणतात.

विलायतेंतील चेंडूफळी ( क्रिकेट ) खेळणारे नामांकित खेळे लवकरच हिंदुस्थानांत येणार आहेत.

पूर्व किनाऱ्यावर रेल्वे करण्या बद्दल तेथील लोकांची फार खुषी आहे असें इंग्रजी पत्रें ह्मणतात.

नाशिक स्टेशनापासून नाशिक शहारापर्यंत ट्रामवे बांधण्याचा परवाना इंडियन रेल्वेफीडर कंपनीस देण्यांत आला.

लुशाई स्वारीबरोबर सर्व खात्याचे लोक अगदींच थोडें जावयाचे आहेत.

विलायतेहून हिंदुस्थानच्या कोणत्याही भागावर दीड तासांत तारेने बातमी कळवितां येते इतकी विलायत जवळ झाली असून ही गोरे लोकांचा पगार पूर्वी प्रमाणेंच ठेवणे अयोग्य नाहीं काय?

. अमेरिकेंत काय काय युक्त्या निघतील कळत नाहीं इमारतीला चुना, विटा लांकूड वगैरे न लावतां त्या त्या ठिकाणीं कागदांचा उपयोग करावा, अशी अमेरिकेंत एक युक्ती निघाली आहे असें केलें असतां पुढील फायदे होतील असें त्यांनीं प्रसिद्ध केलें आहे १ ला पाहिजे त्या मापाचा एक तुकडा करता येतो २ रा लांकडांत रजःकण असल्यामुळें लांकूड दुभागते तसें कागदाचें नाहीं त्यांत भेगा कधींही पडावयाच्या नाहींत, ३ रे हवेच्या योगानें पऱ्यांवर जो परिणाम होतो तो यावर होत नाहीं ४ थें भिंती प्रमाणें इकडचा शद्ब तिकडे ऐकूं यावयाचा नाहीं ५ वें या कागदानें एक रसायण मिश्रण लावलें असतां त्यांस आगी पासून भय नाहीं. ठा० अ०

यंदा पुढील नेटिव गृहस्थास मुंबई युनिव्हरसिटीचे फेलो नेमण्यांत आले:— दयाराम गिडुमल बी. ए. एलएल. बी; वजेशंकर गौरीशंकर, महंमदअली हसनअली बी. ए. एलएल बी. वेंकटराव रुक्मांगद इनामदार बी ए एलएल बी. शांताराम विनायक कंटक एल एम. दाजी आबाजी खरे बी ए एलएल बी. चिंतामण विनायक वैद्य एम. ए. एलएल बी. आणि अर्देसर फ्रामजी वकील बी. ए. एलएल. बी. यांशिवाय इतर कांहीं युरोपियन आहेत.

श्री. शिवाजीराव उर्फ बाळा साहेब होळकर यांची स्वारी मागील सोमवारीं इंदुरास सुखरूप जाऊन पहोंचली.

रा. बहादूर रानडे यांची स्पेशल जज्जाची जागा अगदींच कमी करून त्यांस मुंबईचे स्मॉलकॉज कोर्टाचे मुख्य जज्ज नेमणार अशी बातमी निघाली आहे.

मुंबईच्या लष्करी खात्यांतला पगार वांटणारा लेफ्टेनेंट कर्नल बल्के याणें १०,५४०-९८ इतकी रकम खाऊन खोटें लेख केले. त्याबद्दल चौकशी महू येथें चालून, गेल्या नोंवेंबरच्या २८ व्या तारखेस त्यास एक वर्षाची सक्त मजूरीची शिक्षा दिली. शिक्षा संपल्यावर, त्याणें खाल्लेले पैसे फिटेपर्यंत त्याचा पगार त्याला देऊं नये असा ठराव कोर्टमार्शलनें केला व हा ठराव हिंदुस्थानचे मुख्य सेनाधिपती जनरल फ्रेड्रिक राबर्टस यांणीं कायम केला.

वरोरा ( मध्यप्रांत ) येथील कोळशाच्या खाणींचें उत्पन्न संपलेल्या वर्षांत ४, ७५, ०८० रुपये, झालें व खर्च ३,९९,४६९ रुपये झाला. ह्मणजे नफा ७५ ६११ रुपये झाला ह्मणजे, नफा ७५,६११ रुपये राहिला उमारिया येथील कोळशांच्या खाणीचें संपलेल्या वर्षी उत्पन्न १,१४,४७३ रुपये खर्च २६,३४० रुपये आणि नफा ८८,१३३ रुपये झाला. पहिल्या खाणींत बरेंच दिवसां पासून आग लागली आहे. परंतु ती पासून कांहीं नुकसान होऊं नये असा बंदोबस्त करण्यांत आहे.

पुणें युनिव्हर्सिटी कान्व्होकेशन.—यंदाचा पदव्या देण्याचा समारंभ काल सायंकाळीं चान्सेलर नेक नामदार लार्ड री साहेबांचे अध्यक्षते खालीं मोठ्या थाटानें मुंबईस युनिव्हार्सिटी हाल मध्यें पार पडला. लार्ड रीसाहेब गव्हरनर होऊन आल्या पासून त्यांस आपल्या चान्सेलराच्या स्थानीं बसण्याचा कालच सुप्रसंग आला. त्यांचे भाषणाचा झोंक वगैरे कसा काय होता तो पुढील अंकीं कळविण्यांत येईल. ज्ञा. च.

न्याशनल कांग्रेसचा एकंदर रिपोर्ट सरकारी रिपोर्टरांनीं लार्ड ल्यान्सडौनकडे पाठविला असल्याचें मार्निंगपोस्टांत समजण्यांत आलें आहे.

लार्ड डफरीन लंडनास जाण्या करितां ता. १० रोजीं रोम येथून निघालें तेव्हां ते आतां आपल्या स्वदेशीं असतील.

मेंजर ब्लुमेंथल, जर्मनीच्या फौजेंतील एक सरदार नांव बदलून विलायच्या कोटांची पहाणी करीत होता तेव्हां तो हेर आहे असें समजल्या वरून ४८ तासांत फ्रान्सच्या बाहेर निघून जावें असा त्याला हुकूम झाला.

आमचे नवीन वैसराय साहेब याकडे मंडळी जाऊन मानपत्र देऊन त्यांच्या अभिप्रायाची चांचणी पहात आहे. मुसलमान लोकांकडून कांहीं गृहस्थ वैसराय यांजकडे गेले होते व त्यांच्या मानपत्राबद्दल त्यांस असें सांगितले कीं सरकार ज्याप्रमाणें मुसलमान लोकांस मदत करीत आले त्या प्रमाणें करील, परंतु लोकांनीं इतर लोकां प्रमाणें विशेष उद्योग केला पाहिजे.

युनायटेड स्टेटमध्यें फांशीं देण्याचा प्रकार बंद करून अपराध्यांस विजेच्या योगानें मारण्याचा प्रकार काढला आहे.

जनरल ग्रेनफेल हे स्वाकीम हून लवकरच केरोस परत येणार आहेत.

काश्मीर प्रांतांतील एक सुभे पंडित सुरजबल्ल हे महाराणी साहेबां विषयीं राजद्रोहाचें भाषण केल्यावरून सस्पेंड झाले आहेत.

मि. ग्लाडस्टन हे काडी मोडून देण्याच्या कायद्याच्या विरुद्ध खटपट सुरू करण्याचे विचारांत आहेत. आम्हांस तो कायदा इकडे हवा असें वाटूं लागलें आहे. के०

---


## दामोदर काशिनाथ काळे आणि कंपनी यांचा दवाखाना

या ठिकाणीं मनुष्यांचे व गुराचे सर्व रोगांवर औषधें मिळतात.

औषधें घेण्यास फार सुलभ आहेत. कोणत्याही रोगांवर वैद्य व अलोपाथिक डाक्तर जीं औषधें देतात त्याहून आमचे जवळ असलेल्या औषधांनीं फार लौकर चांगला व फार वेळ टिकणारा गुण येतो.

पटकी, मुळव्याध, परमा, आम्लपित्त खरूज, पैण, नायटे, खवडे, हिवताप, संधिवायू, दमा व खोकला, भगंदर, लहान मुलांचें आंगांत येणें, मुलांचे पोटांतील डबा, गरोदर अवस्थेतील ओकारी, बाळंतरोग व इतर प्रकारचे माणसांचे सर्व रोग ह्यांजवर उत्तम गुण देणारीं औषधें आह्मीं आमचे दवाखान्यांत ठेविलीं आहेत.

गुरांचे रोग—पटकी, लाळ, खेसणें, पाठीला लागणें, पोट फुगणें, गळा सुजणें, आवरक्त, आंचळांतून रक्त येणें, क्षतें, पोटांतील कृमी, ज्वर व इतर सर्व रोग यांजवर या दवाखान्यांत औषधें ठेविलीं आहेत. गाई, बैल ह्मशी, हेले, घोडे, कुत्रीं, मांजरें, बकरी, या जनावरांचे सर्व रोगांवर आह्मीं औषधें ठेविलीं आहेत.

या दवाखान्यांत रोग्यांना औषधाबद्दल थोडी किंमत द्यावयास लागेल.

बाहेर गांवीं राहणारे लोकांना आपआपले रोगाची हकिकत लिहून कळविली असतां माफकदरानें त्यांस अभिप्राय मिळेल. औषधें मागविलीं असतां जीं औषधें आह्मीं पाठवूं त्यांजबरोबर औषध घेण्याचे माहितीचा कागद पाठवूं.

वर लिहिलेल्या कित्येक रोगांवरील औषधाचे एका कुपींत पांच मनुष्यांस पुरण्याइतकें औषध असतें.

जुने रोग व ज्या रोगांना बरें करण्यास वेळ लागतो अशा रोगांनीं पिडलेल्या लोकांस त्यांची मर्जी असेल तर ठराव करूं. ठरावाची जी रकम ठरेल त्यांपैकीं कांहीं आगाऊ द्यावी लागेल.

"हा दवाखाना उमरावती येथें भुसार दरवाज्या बाहेर मिस्टर प्रल्हाद नारायण जोग वकील यांचे वाड्यांत खालचे दिवाणखान्यांत आहे."

उमरावती मेडिकल हॉल. ता० २४-१-८९

दामोदर काशिनाथ काळे आणि कंपनी.


---

हें पत्र आकोला येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

सालअखेर " ७ " ०८
किरकोळ अंकास..........................०४

नोटीशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस ........०१

Six monthly..........
Single copy..............................4 as.

Advertisements
Below 10 lines...2Rs
per line over10...4as.
Repetition derline3as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.

VOL XXIII AKOLA MONDAY 28 JANUARY 1889 NO.4

वर्ष २३ अकोला सोमवार तारीख २८ माहे जानेवारी सन १८८९ इ० अंक४

*K. B. Rele and caclousco smosteffi .*
*PREPARATIONS.*

१ धातु पौष्टिक शक्तिवर्धक गोळ्या.

शरीर निरोगी सदृढ करणाऱ्या गोळ्या ह्याच आहेत अति श्रमानें व हरएक दुसऱ्या कारणांनीं झालेली क्षीणता, मुखावरची निस्तेजता, पांढुरता, मनाची उदासीनता, जीर्णज्वरानें, हगवणीनें खोकल्यानें झालेली क्षीणता, स्वप्नावस्था, मस्तकशूळ, कटीशूळ, इन्द्रियभंग, गंडमाळा, क्षयरोग, रजस्वलास्त्रीयांमध्यें पोटांत दुखणें, धातु जाणें, वाईट स्वप्नें पडणें, हीं ह्यांच्या शवनानें, नाहींशीं होऊन तोंडावर टवटवी येतें मज्जातंतूस तीव्रता येऊन स्मरण शक्ति वाढते काम व अभ्यास करण्यास उल्हास येतो. तोंडास रुचि येऊन भूक लागते. पाचनशक्ति वाढते. ते प्रत्येकानें ह्याचा अवश्य अनुभव घ्यावा. किं० १२ आणे.

२परम्यावर स्वात्रीचे वस्ताद औषध.

हें बिनधोक अत्युत्तम त्वरित गुणकारी आहे. लघवीची जळजळ, तिडिक, धातु जाणें ही तात्काळ बंद होतात परमा किती ही जुना व हट्टी असला तरी निश्चयात्मक बरा होतो. किं० १ रु०

३ परम्यावर पिचकारीचें औषध.

हे ही परम्यावर रामबाण आहे. किं० ०८ आणे.

४ धुपणी ( प्रदर ) वर अमोलिक औषध

सर्व पकारच्या नव्या व जुन्या धुपण्या ह्यानें हटकून जलद बऱ्या होतात. भूक फार लागते. रक्तशुद्धि होऊन शक्ति येतें. किंमत १ रुपया.

५ धुपणीवर पिचकारीचें औषध

वरील औषधा बरोबर हे वापरल्यानें रोगी रोगमुक्त झाला नाहीं हें कचितच. किंमत ०८ आणे.

६ सर्व प्रकारच्या जखमांवर मलम.

चट्टा, चांदी, सर्व नव्या व जुन्या जखमा घाय इ० मिटविणारे मलम कायतें हेंच किं० ८ आणें.

७ खोकल्यावर अचुक औषध.

ह्यानें कफ सुटा पडतों, पडसे, दमा जातो, क्षयाचा,, डांग्या वगैरे गुदगुली होऊन येणारी इ० खोकले अचुक बरें होतात. किं. १२ आणे

८ तापावर रामबाण औषध.

हिंवताप, पाळीचाताप, अंतरताप; जीर्णज्वर, ह्यांवर तर हें रामबाण आहें. जंगल किंवा म्यालेरियम नांवाच्या तापावर हें वस्ताद आहे. ह्यानें भूक लागते अन्न पचतें. किंमत १२ आणे.

९ अजीर्ण, अतिसार, ह्यांवर औषध.

अजीर्ण, अतिसार. संग्रणी, अग्निमांद्य, आमरक्ताची व साधी हगवण इ० बंद करण्यांत हे कधींच मागें हटले नाहीं. किंमत १२ आणे.

ह्या औषधांच्या गुणाविषयीं ज्या अनेक सर्टिफिकीटे मिळाल्या आहेत त्यांपैकीं एकाचा सारांशः—

"के. बी. रेळे यांस लिहावयास अत्यानंद वाटतो कीं, मजकडे पाठविलेलीं सर्व (वरील) * औषधीं मी लक्ष पुर्वक तपासून पाहिली. तीं फार गुणकारीं अतून निर्धोक आहेत.

( सही ) डाक्टर वि. वि. गोखले,
"एम. ए. एम. डी"

सूचना--अनुपानाचा कागद औषधा बरोबर असतो. घाऊक घेणारास चांगले कमिशन मिळेल. प्यकिंग व पोस्टेज शिवाय पडेल.

विशेष सूचना—आमच्या वरील औषधां शिवाय सर्व प्रकारची दुसरी इंग्रजी औषधें जसे, पेनकिलर, क्लोरोडाईन, पेपरमिंट, काडलिव्हर आईल, वाऱ्याचीं तल मलम, सात्, पोंव्याश, टिंकचर्स, सलाईन्स, इनेज, फुरुट साल्ट, वैद्यांस दवाखान्या करितां लागणारीं औषधें व शस्त्रें, वगैरे व तरुण व वृद्ध ह्यांस लागणारे उत्तम गारेचे चष्मे, मुंबईंत आल्या शिवाय, लागण्या योग्य नबरांचें पाठविण्यांत येतील त्याच प्रमाणें औषधांचीं व इतर पुस्तकें ही पाठविण्यांत येतील.

पैसे आल्यास किंवा व्ह्याल्युपेएबल पार्सलनें औषधें व इतर सामान पाठवूं नाटपेड पत्रें पाठवूं नयेत. पत्रव्यवहार खालील पत्यावर करावा.

पत्ता. के. बी रेळे कंपनी,
जुबिली मेडिकल हॉल
कावसजी- पटेल स्टांकरोड मुंबई
हीं औषधें सर्व इंग्रजी औषध विकणाराकडे व मालकाकडे मिळतील.

" TO THE DEAF. "

A person cured of Deafness and Noises in the Head of 23 years, standin by a Simple Remedy, will send a description of it free to any Person who appliesg to J. H. Nicholson, 5 Old Court House Street, Calcutta.

बहिऱ्यांस

बाहिरेपणा आणि २३ वर्षांचा कर्णनाद यांस गुण आणणारे सोपें औषध.

जे. एच् निकलसन, ५ वी ओल्ड कोर्ट हौस स्ट्रीट कलकत्ता, यांस पोस्टपेड पत्र पाठविलें असतां औषधाबद्दलची माहिती फुकट पाठविली जाईल.

रानमाधीकर व साठे न्यायाश्रयकर्ते पुणें यांनीं नवीन तयार केलेला.
हिंदुस्थानचा कराराचा आक्ट.
सन १८७२ चा ९ वा
सभजुतीच्या टिपा व मुंबई, कलकत्ता, मद्रास व अलाहाबाद हायकार्टांचे निवाड्यां सुद्धां
किंमत रु० २॥ व टपाल खर्च ०१ आ.

वऱ्हाडसमाचार.

मिती पौष वद्य १२ शके १८१०

## राष्ट्रीय सभा व तिचे ठराव.

आलाहाबादेस भरलेल्या गेल्या राष्ट्रीय सभेची ठळक ठळक हकीगत व तींत झालेल्या ठरावाची माहिती आम्हीं आपल्या वाचकांस मागें दिलीच आहे. आज या ठरावासंबधानें थोडा विचार करूं.

पहिला, दुसरा, तिसरा व चौथा हे ठराव योग्य आहेत असे कोणी ही प्रांजल मनाचा पुरुष, ज्यानें हिंदुस्थान संबधाच्या सांप्रतच्या प्रश्नांचा कांहीं विचार केला असेल, तो मान्य करील. अध्यक्ष मि. यूल यांनीं आपल्या भाषणांत ह्मणून दाखविलेंच आहे कीं ज्या मंडळ्यांचा किंवा समाजांचा देशाशीं सततचा संबंध आहे, ह्मण जे ज्यांचे कल्याण किंवा अकल्याण देशाच्या सर्व साधारण कल्याणावर किंवा अकल्याणावर अवलंबून आहे अशा मंडळ्यांनीं किंवा समाजांनीं आपल्या तर्फेनें पाठविलेले मुखत्यार कायदे काऊन्सील मध्यें घेतल्यास त्यापासून राजा व प्रजा या दोहोंचेंही हीत झाल्या वांचून रहाणार नाहीं ही गोष्ट निर्विवाद आहे. येथें कित्येक लोक असा आक्षेप घेतात कीं कांहीं मंडळ्या अशा असतात कीं, त्यांचा देशाशीं वास्तविक संबंध असतां ही अशा प्रसंगीं त्या मागें रहाण्याचा संभव आहे. या आक्षेपाला उत्तर एवढेंच कीं ह्या मंडळ्या जर वास्तविक महत्वाच्या आहेत तर त्यांनीं आपली रचना योग्य रीतीनें करून आपल्या रीतीनें मुखत्यार ह्मणून लोक निवडण्याचा अधिकार सर्वां बरोबर त्यासही मिळणार आहे. आतां कांहीं अंशीं मुखत्यार कोणते निवडणें ही गोष्ट सरकारच्या तारतम्य शक्तीवर अवलंबून आहे खरी तथापि ज्या मंडळ्या वास्तवीक मुखत्यार पाठविण्यास योग्य आहेत त्यांनीं आपली योग्यता सरकारच्या नजरेस आणून दिल्यास त्या मागें रहातील असें ह्मणतां येत नाहीं. कोणत्या मंडळीस देशाची वास्तविक कळ कळ आहे कोणत्या केवळ कांहीं विवक्षित लोकांचेंच हक्क पुढें करीत आहेत हें सरकारच्या नजरेस आणून देणें लोक मताचें काम आहे व हें काम वर्तमानपत्रादि जीं लोकमताचीं अनेक साधनें आहेत त्यांनीं योग्य रीतीनें बजाविल्यास कुरकुर करण्यास मुळींच जागा रहाणार नाहीं. तेव्हां अध्यक्ष साहेबांनीं आपल्या भाषणांत सांगितलेल्या अटीवर सरकारनें हा ठराव मान्य केल्यास त्यापासून प्रजेचें ही हीत होऊन हल्लीं सरकारास ज्या अनेक अडचणी सोसाव्या लागत आहेत त्या बंद होतील.

दुसरा ठराव सिव्हिलसर्विस परीक्षा इंग्लंडांत व हिंदुस्थानांत ही व्हावी असा आहे. आमच्या मतें आपल्या देशांतील कॉलेजें व युनिव्हरसिट्या यांत आह्माला हल्लीं जें शिक्षण मिळत आहे ते इंग्लंड, अमेरिका, जर्मनी इ० देशांतील शिक्षणाशीं तोलून पाहतो जरी अपुरते आहे तरी सरकारी कामें चांगल्या रीतीनें करितां येण्यास ते पुरेसें आहे. कारण हीं कामें योग्य रीतीनें करितां येणें ही गोष्ट केवळ अधिक शिक्षणावर अवलंबून नाहीं. त्याला लोकांचे ज्ञान व त्याशीं सदृढता या गोष्टी अगोदर पाहिजे आहेत. आमच्यांतील कांहीं लोक अभ्यासाकरितां इंग्लंडांत जाऊन राहिल्यास येथेंच अभ्यास करणाऱ्यांपेक्षां त्यांच्या आंगीं अधीक विद्वत्ता काय येते हें आह्मांस समजत नाहीं. व अशी कांहीं योग्यता अधीक येते असें जरी क्षणभर गृहीत धरिलें तरी मुलगा आपला देश, आपला जनसमाज, इ० गोष्टी अल्पवयांतच सोडून परदेशीं गेल्या कारणानें सामाजिक दृष्ट्या त्याचा जो तोटा होतो तो तोटा तेथें मिळणाऱ्या नुसत्या विद्वत्तेच्या योगानें भरून येईलसें आह्मांस वाटत नाहीं हे लोंच्या अनुभवावरून आपल्यास माहितच आहे कीं आपल्यांतील जे लोक इंग्लंडहून सिव्हिलसरव्हंट होऊन येतात ते बहुत करून प्रति इंग्लिश मेनच झालेले असतात. स्वदेश ह्मणजे काय व त्याच्या संबधानें आपले कर्तव्यकर्म काय हें त्यांस कळत असतां ही न कळत त्यांकडे त्याचे दुर्लक्ष होतें. शिवाय अशा रीतीनें आह्मास वरिष्ट प्रतीच्या जागा नालायक ह्मणवून घेण्या करितां अल्प वयांत परदेश प्रवास करावयास भाग पाडणें ह्मणजे राणी सरकारचा ५८ सालचा जाहीरनामा एका बाजूस ठेवण्या सारखें आहे. या जाहीरनाम्यांत आपल्या कृपाळु राणी सरकारें आह्मास वचन दिलें आहे कीं "एतद्देशीय लोक आपली लायकी दाखवितील तर सरकारांतील कोणत्याही जागेवर त्यांची नेमणूक होण्यास ते पात्र होतील". असें असतां आमच्यांतीलच कित्येक डेलिगेटांनीं या ठरावांत इंग्लंडास कांहीं दिवस रहाणें भाग करण्याच एक कलम घुसडून देण्याचा जो यत्न केला होता त्याचें आह्मास आश्चर्य वाटतें तथापि बहुमतानें तें कलम नापसंत झालें ही आनंदाची गोष्ट आहे.

तिसरा ठराव एक्झिक्युटीव्ह ... ल हीं दोन्हीं कामें एकाच व्या कारीहातीं नसावी या बद्दल.

खंडण पद्धती पासून क...
असतात त्याचा ज्यांनीं रि.

असेल किंवा ज्यांनीं ह्मणून या गोष्टीचा कांहीं विचार केला असेल त्यास या ठरावाचें महत्त्व दिसून आल्या वचून रहाणार नाहीं. फिर्यादी तोच व न्याय देणाराही तोच असल्या मुळें अनेक प्रसंगीं न्याय देवतेस मान खालींच घालावी लागते. हा अनुभव आमच्या वऱ्हाडांत, बंगाल्यांत, मुंबईंत व इतर सर्व प्रांतांत सारखा येत आहे. चवथ्या ठरावा संबंधानें ही याचा गोष्टी लागूं पडतात. ज्यूरीच्या निकालाचा फायदा आम्हास मिळत नसल्या मुळें कधीं कधीं कसा अन्याय होतो याचीं उदाहरणें ही वारंवार आपल्या दृष्टीस पडतात.

येथवर राष्ट्रीय सभेच्या ठरावांत दोष देण्या सारख्या कांहीं गोष्टी आम्हांस दिसून आल्या नाहींत. या पुढील ठराव मात्र, जरी एकंदरीनें ते सर्व मान्य आहेत तरी, ते सर्वस्वीं निर्दोष आहेत असें आम्हांस वाटत नाहीं. अमुक अमुक गोष्टींच्या चौकशी करितां कमीशनें नेमा अशा मोघम मागण्या करणें, आपण कांहीं एक ठरीव सूचना न करितां ही गोष्ट वाईट आहे ती अपायकारक आहे ती दूर करा ह्मणून सांगणें, आम्ही मोठे राजनिष्ट आहो, शत्रूशी अशी टक्कर देऊ वगैरे पोकळ गप्पा मारणें, यांत काय अर्थ आहे? अशा गोष्टी पासून घोटाला होऊन मात्र जातो. उदाहरणार्थ पांचवा व आठवा ठराव घ्या.

पांचवा ठराव हा आहे कीं — "या देशांतील लोकांचा साधारण समज असा आहे कीं सध्यांचें पोलिस खातें चुकीचें असून त्यापासून लोकांस जुलूम होतो त्या करितां जितकें लवकर होईल तितकें लवकर या खात्याची चौकशी करण्या करितां सरकारी कामगार व इतर कांहीं लोक यांचें कमिशन नेमण्या बद्दल विनय पूर्वक सरकारास विनंती करावी."

आम्हाला वाटतें अशा प्रकारच्या मागणींत कांहीं अर्थ नाहीं सध्यांच्या पोलीस खात्यापासून अनेक चुका होतात व लोकांस जुलूम होतो या गोष्टी अगदीं खऱ्या आहेत परंतु त्याचें कारण काय याचा विचार कोणी केला आहे? असा जुलूम व अशा चुका केवळ अज्ञानानें होत आहेत हे कितीकांच्या लक्षांत आलें असेल? पोलिस खात्यांतील वरीष्ठ प्रतीच्या अधिकारांवर कसे लोक असोत. खालच्या जागा अखेर शुन्य, भज्ञा, असे लोक येणार या लोकांची स्थिती जोंपर्यंत अशीच आहे तों पर्यंत त्यांच्या हातून चुका व जुलूम होणारच. या देशांत सरकारी अमलदार म्हणा, मोठमोठे, जहागीरदार म्हणा किंवा जमिनदार म्हणा, यांच्या हातून प्रजेवर जो जुलूम होत आहे तो प्रजा अज्ञान असल्या कारणानें आपलीं दुःखें कशी दुर करावी, आपल्या तक्रारी शेवटपर्यंत कशा नेऊन पोंचवाव्या इत्यादि गोष्टी त्यास कळत नाहींत म्हणून होतो या करितां जोंपर्यंत रयत अज्ञान आहे तों पर्यंत आमच्या पुढाऱ्यांनीं अशा किती ही मागण्या केल्या व वरिष्ठ अधिका... मगार किती ही न्यायी व समंज... हा जुलूम चालणारच. सभेनें ...ळो पैकीं एक एजन्सी नेमून ...लिस खात्यांतील हलक्या दर्जाच्या लोकां कडून होणारा जुलूम वेळोवेळीं वरिष्ट अधिकाऱ्यांच्या नजरेपुढें आणून देण्याचे मनावर घेतलें असतें तर ही अडचण पुष्कळ अंशीं दूर झाली असती. सुधारलेल्या देशांत जुलमी पोलिसाचो खोड मोडण्यास असेंच उपाय योजिलेले असतात. लोकमताचा सर्व जोर घडलेल्या जुलमाच्या गोष्टीवर आणून अपराध्यास न्यायदेवतेसमोर आणिल्या शिवाय हा जुलूम मोडणार नाहीं.

दहावा ठराव असा आहे कीं सध्यांचे लोकांचें दारिद्र्य एतद्देशीय कारखान्यास उत्तेजन देण्याची अत्यावश्यकता व सध्यां आपल्या स्वाधीन जीं साधनें व जी माहिती आहे ती अपूर्ण असल्या कारणानें कोणत्या तरी एका नियमीत पद्धतीवर धंदे शिक्षणाची सुरवात करण्यास येणाऱ्या अडचणी या गोष्टीकडे लक्ष दिलें असतां उद्योग धंद्यां संबंधानें आपल्या देशाची सांप्रतची स्थिती कशी आहे याची चौकशी करण्या करितां एक कमिशन नेमण्या विषयीं सरकारास विनंती करणें अवश्यक आहे"

उद्योग धंद्यासंबंधान लोकांच्या अंगीं जो उत्साह लागतो व जें ऐक्य लागतें त्याची आपल्या देशात अगदीं उणिव आहे व असें असल्या कारणानें नुसत्या धंदे शिक्षणानें देशांतील कारखाने सुधारतील किंवा वाढतील असें आह्मास वाटत नाहीं. कोणत्याही देशांतील धंदे व कला उर्जित दशेस येण्यास मुख्य गोष्ट ही आहे कीं त्याचा खप असला पाहिजे. आपल्याला स्वदेशीय मालासारखा व किंबहुना त्यापेक्षां चांगला माल जर अधिक स्वस्त मिळत आहे तर एतद्देशीय मालाला खप कसा यावा? आपला माल स्वस्त विकता येण्यास नुसत्या धंदे शिक्षणानें कांहीं व्हावयाचें नाहीं. त्याला निरानिराळा उद्योगांचे ऐक्य झाले पाहिजे व भांडवल ही पाहिजे. धंदेशिक्षणाची अवश्यकता आहेच असें जरी घटकाभर गृहीत धरिलें तरी त्या बद्दल सरकाला जी माहिती द्यावयाची तिला सरकारी कमिशन कां पाहिजे? आमच्यांतच त्या कामीं योग्य असे स्वदेशाभिमानी नाहींत काय? सरकारी नात्यानें मिळविलेली माहिती किती खात्री लायक असते हें आह्मी सांगितलें पाहिजे असें नाहीं. आजपर्यंत जीं कमिशनें बसलीं त्यावरून याचा अनुभव आलाच आहे. पब्लिकसर्व्हिस कमिशन, फॉरेस्ट कमिशन इ० कमिशनें अनेक अजकर बसलीं त्यांनीं काय केलें? मग व्यर्थ कमिशनवर कमिशन मागण्यांत काय अर्थ आहे?

गुदस्त सालीं मद्रासेस राष्ट्रीय सभा भरली तीजबरोबर एक "सामाजिक राष्ट्रीय सभा" ही भरल्याचें आमच्या वाचकांस माहीतच आहे. याच मंडळीची दुसरी सभा यंदा अलाहाबादेस राष्ट्रीय सभे बरोबरच भरली होती. अध्यक्षस्थानीं राव बहादूर रानडे हे होते. गुजराथ, बंगाल मद्रास वगैरे प्रांतांतील कांहीं अधीक लोक यंदा या सभेचे सभासद झाले. आपल्या सामाजिक स्थिती संबंधानें बालविवाह, स्त्री शिक्षण इत्यादि विषयांवर वादविवाद होऊन सभेचें काम कसें चालावें या संबंधानें कांहीं नियमही ठरविले गेले. देशाची सामाजिक सुधारणा करणें हें या सभेचें काम आहे व हें काम खालीं लिहिलेल्या उपायाच्या द्वारें सिद्धीस नेण्याचा मंडळीचा विचार आहेः—

(१) सुधारणेची निरनिराळीं कामें करितां येण्या साठीं भांडवल जमविणें.

(२) जागोजाग उपदेश करण्या करितां उपदेशक पाठविणें.

(३) वर्षांतून कांहा नियमित वेळीं सामाजिक विषयावर व्याख्यानें देणें.

(४) स्थानिक व निरनिराळ्या जातीच्या मंडळ्या स्थापणें.

(५) इंग्रजी व देशीभाषांत समाज सुधारणेच्या विषयावर पुस्तकें प्रसिद्ध करणें

(६) कायद्या प्रमाणें समाजाची नोंदणी करणें.

(७) आपल्या स्त्री किंवा पुरुष नातलगांचीं लग्में कांहीं ठरीव वयाच्या आधीं न करण्या बद्दल, व आपल्या शक्ती प्रमाणें कुटुंबातील स्त्रियांस शिक्षण देण्या बद्दल शपथ घेणें व या शपथा प्रमाणें वर्तणूक न झाल्यास ठरीव दंड देणें.

(८) स्त्री शिक्षणाचा प्रसार करणें.

अलाहाबादच्या मार्निंग पोष्ट वरून कळतें कीं यंदाच्या राष्ट्रीय सभेच्या वेळीं सरकारांतून कोणी अमलदार मुद्दाम कोणी कामगार काय काय होतें हें पहाण्या करितां आले होते व त्यांनीं आपला रिपोर्ट ही सरकारकडे रवाना केला आहे. त्याच पत्रांत आणखी असें लिहिले आहे कीं "याशिवाय आह्माला या रिपोर्टवरून सरकार काय करणार याबद्दल कांहीं विलक्षण बातमी समजली आहे. परंतु ती येथें आपच्याच्यानें आतांच देववत नाहीं." गोष्ट खरी असेल तर हे नवीन लचांड काय आहे इकडे सर्वांचे डोळे लागले आहेत. काय बाहेर निघत पहावें.

क्राफर्ड कमिशनचे काम एकसारखे ६७ दिवस चालून शेवटास गेलें. उभयपक्षांकडील वकिलांची भाषणें होऊन कमिशनचा रिपोर्ट ही मुंबई सरकारकडे गेल्याचे समजतें अर्थात लार्डरी सारखे सत्यपक्षीं गव्हरनर असतां कोणत्याही प्रकारें अन्याय होईल अशी शंकाच आणणें नको पण त्यांच्या तरी हातीं काय आहे. खंबायत प्रकरणीं वुइलसन साहेबांस त्यांनीं दोषी ठरविले होते पण सेक्रेटरी आफ स्टेट कडून किल्ली उलटी फिरली गेली. कांहीं असो सत्य पक्षाला न्याय मिळो हीच आमची इच्छा आहे.

याच खटल्याचें एक पिलूं जे पुण्यांतील साक्षींनीं उपस्थित केलें होते त्या संबंधानें मुंबई हाय कोर्टांत फुलबेंच भरून विचार झाला. डबीर सिंदेकर वगैरे जी मंडळी आह्मी लाच दिली असें कबूल करीत आहे त्यावर खटले करावे कीं नाहींत या संबंधानें हा विचार होता निकाल अद्याप प्रसिद्ध झाला नाहीं.

बाउंडरी कमिशनचा निकाल होऊन गेला व त्या बाजूला आतां अडचण कांहीं राहिली नाहीं असें वाटत होते परंतु नुकत्याच अशा बातम्या येऊं लागल्या आहेत कीं रशियाचे पाऊल अफगाणिस्थानाच्या सरहद्दींत अधीक अधीक पडत चाललें आहे. तो बहादर मार्गे हटतच नाहीं. अर्थात अशी गोष्ट होऊं लागल्यास आमच्या सरकारला या संबंधानें कांहीं तरी निश्चय करावा लागेलच. अमीरानें आपल्या राज्यसंरक्षणासाठीं पाहिजे तशी तजवीज करावी असें तर कधींच होणार नाहीं. कारण तसें झाल्यास अमीर रशियाच्या स्वाधीन होईल व तें तर आमच्या सरकारला इष्ट नाहीं. छे, ज्याच्यासाठीं लाखो रुपये सहज खर्च करण्यास आमचें सरकार मागें पुढें पहात नाहीं त्याला एकटे टाकून देईल अशी कल्पना ही करणें नको.

(लिहून आलेला मजकूर.)

कोणत्याही गोष्टींत यश प्राप्ति करून घेणें झाल्यास आपलें सर्व चित्त व वित्त त्या गोष्टीकडे प्रसंगानुसार अर्पण केल्या शिवाय इष्ट हेतु साध्य होण्याची आशा करणें व्यर्थच होय. आम्हास आमची सुधारणा होणें जितकें अवश्यक वाटत आहे, व ती घडून आणविण्या विषयीं आम्ही बोलण्यांत जितकी आतुरता व जितका पटाइतपणा दाखवीत आहो तितकीच किंवा त्याच्या शतांश तरी उत्कटता आमच्या हृदयामध्ये आहे काय? सत्कृत्यें शेवटास नेण्याच्या कामांत शेकडों विघ्नें उत्पन्न होतात असा सर्व साधारण नियम आपणास आढळून येतो. बोलण्यांतील पटाईतपणा आमच्या कृतींत मुळींच नसल्या कारणानें एखाद्या सत्कृत्यास थोडासा जरी अडथळा आला तरी आमचे हात पाय गळूनच जातात याचें कारण मनाचा कोतेपणा व धैर्याचा अभाव नव्हे काय? व या मुळें आम्हास आरंभ शूर असें जर कोणी म्हटलें तर त्यांत नवल तें कोणतें? परवाच्या राष्ट्रीय सभे संबंधानें एका बाबुराम पाळबोस नांवांच्या गृहस्थांची हकीगत प्रसिद्ध झाली आहे, तिच्या वरून देश सुधारणेचे व पुढारी म्हणविणाऱ्या लोकांच्या अंगीं प्रस्तुतकाळीं किती धैर्य व स्वहिताकडे दुर्लक्ष पाहिजे, आणि कर्तव्य कर्म बजाविण्याविषयीं किती तत्परता पाहिजे हें स्पष्ट दिसून येतें; ती हकीगत अशीः—

उत्तर कडील हिंदुस्थानांतील एक जिल्ह्यांत बाबुराम पाळबोस एम्. ए. बी. एल्. नावाचे एक मोठे हुशार वकील असून हिंदु समाजांत ते वजनदार व सन्माननीय गृहस्थ आहेत. ते सरकारी वकील असून आपल्यास पढारी म्हणवून घेतात. त्यांच्या सारखे थोर थोर लोक लोकमताचे अभिमानी व लोकांच्या प्रत्येक प्रकारच्या चळवळी मध्यें म्होरके पंढेच असतात. ते कित्येक समाजाचे अध्यक्ष असुन त्या संबंधानें त्यांच्या पदरास बरात खार लागतो व त्याचा अमोलिक वेळ निरर्थक खर्च होतो. तरी पण समाजांची महत्वाची कामें फुकट करून देण्यास कधींही मागें पुढें पहात नाहींत. अशा प्रकारचे योग्य गृहस्थ अलाहाबाद येथें जी राष्ट्रीय सभा भरणार होती तिला त्या प्रांतांतील एका जंगी सभेमध्यें सर्व लोकांनुमतें मुकत्यार नेमले गेले यांत आश्चर्य तें कसलें.

ह्या निवडणुकीच्या दुसरे दिवशीं सकाळीं त्या जिल्ह्यांतील कलेक्टर कडून आमच्या वकील साहेबांस एक चिठ्ठी आली व तींत यांस हुजूरांकडून कांहीं निकडाच्या

कामा करीता १० वाजल्या बरोबर कचेरींत पाचारण झाले होतें वकाल साहेब १० वाजल्या बरोबर कचेरींत हजर झाले परंतु हुजुरांची स्वारी पुढें अर्ध्या तासानें कचेरींत दाखल झाल्यावर त्या दोघांत खालीं लिहिल्या प्रमाणें संवाद झाला:—साहेब रामपाल गुडमॉर्नींग, तुम्हांस माझी वाट पहात फार वेळ तर बसावे लागले नाहींना, माझ्या चिठ्ठीस मान देऊन तुम्हीं आल्याच्या योगानें मला फार आनंद झाला, मी ऐकतो कीं तुम्ही पक्के कोंग्रेश वाले बनला अहांत आणि अलाहाबादेस भरणाऱ्या वार्षीक तमाशांस जाणार अहां. ( हसत, हसत, ) तुम्हीं बाबु लोकांनीं आम्हा गरीब गोऱ्या लोकांनां देशा बाहेर हांकलुन देण्याचा विचार तर केला नाहींना, हे कांग्रेसवाले लोक आम्हास आमची गवाळी गुंडाळून घेण्यास व घरचा रस्ता सुधारण्यास तरी फुरसत देतात किंवा नाहीं कोण जाणें बाबा, कां करतात— समुद्रात्रृप्यंटु!

बाबु— आज साहेबांची लहर मस्करी करण्याकडे लागली आहेसें दिसतें. मला बोलावणें कां पाठविलें होतें हें विचारण्याची मला परवानगी असावी कारण मला दुसरीकडे जावयाचे आहे?

साहेब— जायाचे तरें असेलच कारण तुह्मी आतां काय कांग्रेसवाले बनलां! परंतु थट्टेची गोष्ट नव्हे— मला तुह्मास उघड सांगितलें पाहिजे कीं, हे तुमचे कांग्रेसला जाणें मला मुळींच पसंत नाहीं. कशाला, कां, हें सांगण्यात अर्थ नाहीं. परंतु तुह्मांस माझें फक्त इतकेंच सांगणें आहे कीं जर तुह्मी कांग्रेस सभेला जाऊन मिळाले तर माझ्या व दुसऱ्या कामगार लोकांचे मनांतुन उतरून जाल.

बाबु— साहेबाकडून मला बोलण्यास परवानगी असावी कीं, योग्य विचार करून राष्ट्रीय सभेस सहाय करण्याचा मीं निश्चय केला आहे व परवा अलाहाबादेस भरणाऱ्या सभेस जाण्याचा माझा दृढ निश्चय झाला आहे. आपण व आपणा सारख्या दुसऱ्या दयाळू कामदार लोकांचे मनातुन मी उतरून जाईन ह्या विषयीं मला फार वाईट वाटतें; परंतु ही सभा चांगली देशहित कर्ती आहे व हिला जाऊन मिळणें हे एक माझें कर्तव्य कर्म आहे असा समज जो पर्यंत कायम आहे तोपर्यंत ह्या सभेपासून अलग राहण्यापेक्षां आपलेचसे काय परंतु इतर सर्व जगाचे वाईट ह्मणवून घेणें मला पेत करेल. माझ्या बोलण्याचा ओघ मला अशा तऱ्हेनें वळवावा लागतो ह्या बद्दल मला अतीशय वाईट वाटते परंतु साहेब, ज्या ठिकाणीं माझ्या देशाचा संबंध आला त्या ठिकाणीं कोणते ही नुकसान सोसण्यास मला एका पायावर तयार असले पाहिजे. (पुढें चालू.)

# The Berar Samachar

MONDAY JANUARY 28, 1889.

## THE SPEECH OF THE TWO GOVERNORS AT THE TWO CONVOCATIONS.

The Convocation of the Bombay University is always a matter of interest to us in Berar. Many of our students get their collegiate education in the Colleges of that University. The annual speech of the Chancellor at the Convocation is awaited with interest and this year it has a particular interest as Lord Reay made his appearance as Chancellor only this year and made a speech. Of course his speech was replete with his usual liberal views and set up a high ideal of a University. We cannot take any exception to the ideas embodied in the speech, but we must say that in a University address, we always expect some sound advice to the young men who are shortly to enter upon the world's great stage. The time when a youthful gentleman finishes his Colleage career and is about to step in the world, is particularly suited for giving him wholesome advice. Those great virtues which have made men great ought to be impressed upon youthful minds, so as to stir useful ambition. Lord Reay was reticent about the policy which Government was going to pursue with regard to higher education in the Presidency; and it is very pleasant to find that the Viceroy made it a particular point to explain the would be policy of government regarding higher education. He repudiated the idea that seemed to have occupied the public mind of late that Government was going to withdraw its support from higher education. It was generally believed, and with good reasons too that the Government considered that higher education had been a little over done and that therefore Government was going to pursue a policy of retrenchment in matters educational. The fact that in the Bombay Presidency Government was trying to close certain Government High-Schools and was contemplating the abolition of some Colleges, as also the fact that similar attempts were being made in the other Presidencies, had lent color to the general belief. Nor for the first time the Viceroy explicitly stated in his short address that there was no ground for such a belief but what the Government considered desirable was to introduce technical education so as to supply a proper channel to the energies of swarms of young fellows that get a schooling and pass examinations annually so far as it went the Viceroy's speech was very satisfactory on all sides. The Viceroy's speeches until now show that he is not a perfect diplomat as his predecessor.

The Viceroy and Lord Reay were both silent as to the Congress; and though it was not to be fairly expected that some remarks would fall from the two chancelors regarding that much abused natinal movement, yet if they had, there is no doubt University Convocation would have been a far better occasion to speak of such things as the Congres than a jolly good dinner at St. Andrew's at Calcutta.

## THE TIMES OF INDIA AND THE CONGRESS.

The Times of India in its issue of 23rd current criticizes the Congress, its aims and its doings and suggests to Government the steps to be taken in connection with it. This is not an unusual thing with the Times; it is avowedly an exponent of Anglo-Indian official opinion therefore possesses undoubtedly influence with the official world and those 'waverers' who have now been strengthened in their Anti Congress opinions by the expression of Lord Dufferin anent the Congress. The Times has well nigh reached a boiling point as it finds that the papers in London do not revile the Congress as well as itself. Critics, like the Times of India make one thing quite plain to those who possess 'one anna of brain' that the phalanx of arguments which they try to array before the public is not sound and in fact there is no sound argument that can possibly be urged against the great national movement in India.

Now what are the pretensions of critics like the Times? They profess to know of things Indian better than their compeers in England, as the former are on the spot and therefore likely to know more. It is a truism to say that those who are on the spot must usually be better Judges of things than those that have to judge of them at a distance. But what do critics in the position of Times know of India, her wants and aspirations. It is a notorious fact that the opportunities for knowing the Indian people are shamefully neglected. The Times and the Civil-Service wallas for whom the Times claims a more intimate knowledge of Indian people than Sir. W. Hunter, keep so far aloof from native society and are always so much out of touch with the instincts and aspirations of the people that that is the one great defect in the present administrative system. In the teeth of these facts, that the 'Times' is simply arrogating to itself and Civilian wallas a knowledge of the Indian people will be abundantly clear.

Papers like the 'Times of India' can not be expected to be fair with regard to the Congress. But from public journals like the Times one might certainly have expected *facts* to strengthen the case against the Congress. What we find however, is a series of misrepresentations of facts regarding the Congress. That the leaders of the Congress have threatened to force the hands Government is as untrue as ever. The passage of Mr. Hume, Secretary to the Congress, which is relied upon by the opponents of the Congress to prove the assertion has now been fully explained by Mr. Hume and Mr. Eardley Norton of Madras. Indeed it required a Viceroy to twist out of the passage into a meaning which it was never intended to convey. The second charge against the Congress is that Raja Shiv Prasad an opponent of the Congress was 'howled down' at the Congress when he rose to move a certain resolution. As a matter of fact Raja Shiv Prasad never rose to move a resolution; he only spoke *against* the resolution of the 'Legislative Councils' and that was the only occasion when he rose to speak. That he was hissed at is certain and he must have anticipated it very well as he came to the Congress a declared anti Congress man and had the temerity to speak against one of the chief resolutions which the Congress has laid to heart. The Raja, be it said to the credit of the Congress, was heard very patiently indeed and it was a great wonder that rotten eggs and dead cats were not thrown at him as would certainly have been the case if such a one had addressed an audience on an English platform. These are the charges thought sufficient to prove that the Congress is a 'seditious and disloyal' movement. The criticism reaches a height of absurdity when it is urged as a proof of the evil spirit that pervades the Congress-wallas that the latter have gone straight to Parliament for redress without going to the Secretary of State. Now as a matter of fact if the Times had been a little more careful, it would have at once found out that the Congress does every year by a special resolution send on its resolutions to the Viceroy with a prayer that they should be sent on to Her Majesty's Secretary of State. But supposing the Congresswallas did go to Parliament at once without going to the intermediate authorities, does that prove sedition or evil spirit?

And at last when we come to the remedies suggested to stop all this expression of sedition and rank disloyalty the Times comes out in its best. The Government is asked to declare the objects of the Congress incompatible with British rule and to pass a *short* Act to stifle meetings with objects like that of the Congress. If Government were conducted on principles so short-sighted, unstatesmanlike and clearly suicidal, British rule would have perhaps been a thing of the past. It is Britain's fair justice, the liberty of speech and liberty of public meetings and above all its moral influence that holds up her rule. The saddest misfortune would long ago have come to British rule if critics like the Times were at the helm of British affairs. Let the Times and its followers know full well that the Congress cannot and will not be stopped, not withstanding the grossest misrepresentations regarding the Congress its promoters, aims and doings.

HYDRABAD, JAN. 19.—The Duke and Duchess of Connaught will arrive here on the 23rd instant. They will stay at Basheerbagh as the Nizam's guests. Grand preparations are being made. The road from the Station to the city will be rendered attractive with flags, arches, and various decoration. There will be grand illuminations on all roads and in the Nizam's palace. There will be also sports and parades. The estimated expenses will amount to about five lakhs of rupees.

Sir Lepel Griffin, in a lengthy letter he has written to the *times*, deprecates attaching any importance to Mr. Dadabhai Naoroji, who as a Parsee is in no way a representative of the Indian people. Sir Lepel describes the banquet given by the National Liberal Club to Mr. Dadabhai Naoroji as merely a political manœuvre directed against Lord Salisbury.

## वऱ्हाड.

हवामानः — थंडी अगदीं कमी झाली. उन्हाळ्याचीं चिन्हे आतां पासूनच भासू लागली आहेत.

मि. डोडन सा० कमिशनर हे गेल्या २५ ता० येथें आले, येत्या पहिल्या तारखे पर्यंत येथें मुक्काम आहे; नंतर पुढें यवतमाळा कडे जाणार.

कर्नल स्पान्स्की डे. क. बुलढाणा हे रजेवर जाणार त्यांचे जागीं येथून मि. आवर्ड स्पे० अ० क० हे एक दोन दिवसांत जाणार आहेत.

मि. सी. ए. डब्ल्यु डेव्हिस अ. क. यांची येथें बदली झाली व त्यांनीं गेल्या आठवड्यांत येथें स्पे. अ. क. चे कामाचा चार्ज घतला.

गेल्या शनिवारी सायंकळीं येथें इं. म. शाळेंत मि. रो यांचे व्याख्यान झालें. व्याख्यानकार मिशनर, व तदनुसार त्यानें विषय ही "ख्रिस्ती धर्म"च घतला होता.

कर्नल ग्रांट सा. डे. क. हे येथें येत्या पहिल्या तारखेस अपकारी जिल्हा कारिता येणार आहेत.

## वर्तमानसार.

नवडला

ह्रास स्ट्रीट कलकत्ता, यास पारटपड पत्र पा- | किंमत रु० २॥ व टपाल खर्च ०६ आ. | अलाहाबादेस जाणार हें होतें. बाबूरामपाळ | नो केली व यावज्जन्म राष्ट्रीय सभेचा पूर्ण

मुंबई हायकोर्टाचे जज्ज मि० स्काट यांस निजामचे सल्लेगार ह्मणून तिकडे जाण्याचा हुकूम झाला.

लंडनांत रोज पन्नास हजार रुपयांची फुलें खपतात.

दक्षिण आफ्रिकेंत भुगाडा येथें आरब लोकांचा भयंकर दंगा होऊन पुष्कळ इंग्रज, फ्रेंच वगैरे राहिवाशी लोक व नेटिव, ख्रिस्तीयन यांची कत्तल झाली.

ठराव- सरकारी कामगाराच्या पगारावर प्राप्तीवरील कराची आकारणी करितांना त्याजवर आफिसच्या किंवा खात्याचे मुख्यानें किंवा सरकारानें दंड केला असेल तर ती रकम पगारांतून वजाकरून बाकी रकमेवर कराची आकारणी करावी, असें हिंदुस्थान सरकारानें ठरविलें आहे. क० त०

मुंबई— परेळ येथील सरकारी माहालांत मार्गेत-लार्डरे यांच्या आश्रयाखालीं, मि० पराशिव्हले स्पेन्सर हे विमान उडविणार आहेत. व ते स्वतः त्यांत २००० फूट उंच जाणार आहेत. विमान उंच गेल्या नंतर त्यांतून मि० स्पेन्सर खालीं जमिनीवर उडी मारतील व जमिनीपासून १०० फुटांचे अंतरावर ते आल्यावर ते आपली छत्री उघडतील आणि मजा पाहावयास आलेल्या लोकांजवळीक सुरक्षित येऊन पोहचतील. दी०

जर्मनीच्या बादशहांनीं आपल्या कामगार लोकांस दाढ्या काढण्यास हुकूम केला. सु० प०

चिनांत मोठा दुष्काळः— शांघाईची तारीख १७ ची तार सांगते कीं, यांगस्ट व पीतनदीच्या जवळील प्रदेशांत मोठा दुष्काळ पडण्याचा संभव आहे. आह्मी प्रांत पीतीनदी वाहून नेला. पांच प्रांतांत पीक मुळींच नाहीं शाटंग आणि न्युचंग येथें नदीचा पूर येऊन पीक वाहून गेले. लाखो लोक अन्नान्न करून मरत आहेत, फक्त एका प्रांतांत अर्धा लाख माणूस उपास मारानें तडफडते आहे, दुष्काळांत सांपडलेल्या लोकांचे रक्षण करण्याकरतां सरकारच्या परवानगीनें सभा स्थापन झाली असून वर्गणी गोळा होत आहे.

येत्या फेबरवारी महिन्याच्या २१ व्या तारखेस विलायतेचें पार्लमेंट उघडेल.

ब्रम्हदेशांतील या नांवाच्या प्रांतांत बंडखोरांनीं अतिशय बंडाळी मांडली आहे. गेल्या महिन्याच्या ३१ व्या तारखेस बंडखोरांनीं काच आणि मोसो यांच्यामध्यें आमच्या १० व्या मद्रास फौजेवर हल्ला केला व आमच्यांतील ७ शिपायांस ठार मारून १० जखमी केले व त्यावेळीं त्यां फौजेस बंगाल व हैद्राबाद घोडेस्वारांकडून मदत मिळाली नसती तर मद्रास फौजेचा समूळ नाश झाला असता. मद्रास फौज गंगा प्रांतात आली व दुसरी इंग्रजी फौज जमत आहे पण तेथील अन्नपाण्याचा पुरवठा कमी होत आहे. हा गंगा प्रांत बंडखोरांची असल्यामुळें त्या ठिकाणीं पुष्कळ फौज जमा करण्यांत येत आहे व आतां त्या प्रांतांत बडखोरापासून त्रास होणार नाहीं असें ह्मणतात, या प्रांताजवळ १४०० शत्रुनीं तळ दिला असून त्यांस आणखी ७,००० चीन लोक मिळणार व मग गंगा प्रांतांवर ते हल्ला करणार असें हा कोणी ह्मणतात. आजुबाजूस शत्रु अजून जमा होत आहेत असें ह्मणतात. एकंदरीनें अझून ब्रह्मदेशांत शांतता झाली नसून बरीच बंडाळी सुरू आहे असें ह्मणतात.

मोठी जबाबदारी शिरावर घेऊन चालणाराची जगांत मोठी त्रेधा उडत असते. आमच्या इंग्लंड देशानें किती देशाच्या जबाबदाऱ्या आपल्या शिरावर घेतल्या आहेत व अद्याप ही घेत आहेत याचा फारच थांग लागत नाहीं. पण यामुळें एखादेवेळीं त्याची फारच धांदल उडते ऐरिष लोकांस स्वतंत्रता मिळावी ह्मणून खटपट चालली असून स्वतंत्रतेचे गाठोडें इंग्रजलोक या बगलेंतून त्या बंगलेंत लपवीत आहेत तोंच पाठी मागून स्काटलंड देश ते गाठोडें हिसकूं पाहात आहे! आपल्यास स्वतंत्रता असावी ह्मणून त्याची ही भगभग ग्ल्याडस्टन साहेबांच्या भोंवती लागली आहे पण तो ह्मातारा कसला खप्पी! त्यानें रामाय स्वस्ति रावणाय स्वास्ति करून गप बसविले आहे! स्वतंत्रतेसारखा अनुपम जिन्नस "देगबाई जोगवा" केल्यानें कोणी कोणास दिला आहे काय! तो कोणी जबरीनें मिळवील त्यासच मिळावयाचा. अमेरिकन असाच जोगवा मागितला असतां तर तिला आजपर्यंत तरी एखादी चिमूट मिळाली असती काय! पण तिनें जेव्हां गाठोड्यास हासडे मारून ते हस्तगत केलें तेव्हांच गाठोडेवाले "ही घे स्वतंत्रता" ह्मणून पाठीस लागून अमेरिकेस स्वतंत्र केलें हें तत्व सर्व स्वतंत्रतेच्छुनी पक्कें लक्षांत बाळगलें पाहिजे.

हिंदुस्थानच्या राज्यकारभाराची चौकशीकरण्यासाठीं रायल कमिशन नेमावे, ते नेटिव व युरोपियन यांचे मिश्र कमिशन असावें- व त्यास हिंदुस्थानांत व इंग्लंडांत पुरावा घेण्याचा अधिकार असावा, अशी सूचना आपण पुन्हा पार्लमेंटापुढें आणणार अशी सुचना जमदार ब्याडला यांणी दिली आहे. पब्लिक सर्व्हिस कमिशनचा व फिन्यान्स कमिशनचा असे दोन्ही रिपोर्ट आल्या शिवाय या गोष्टीचा विचार सरकारास करितां येत नाहीं अशी टाळवाटोळव या मार्गे अंडर स्टेटसेक्रेटरी करीत असत. आतां हे दोन्ही रिपोर्ट स्टेटसेक्रेटरीच्या हातांत आहेत तेव्हां अंडर स्टेटसेक्रेटरी कोणत्या मुद्यावर टाळाटाळ करितात पहावें. हिंदुस्थानावर कंपनीचा अम्मल होता तेव्हां कंपनीची सनद पालटण्याच्या वेळेस अशी चौकशी होत असे. हिंदुस्थान ब्रिटिश सरकारच्या खास अमलाखालीं गेल्यास बरोबर ३० वर्षे झाली इतक्या मुदतींत या कारभाराची मुळींच चौकशी झाली नाहीं. कंपनीच्या अमलाच्या वेळीं अव्यवस्थेचा सगळा दोष कंपनीच्या माथामारण्यास सवलत होती, आतां सगळा दोष स्टेटसेक्रेटरी व हिंदुस्थान सरकार यांच्या ह्मणजे परंपरया पार्लमेंटाच्या माथीं बसणार ह्मणून ही सगळी टाळाटाळ चालली आहे हे लोकांस तेव्हांच कळेल. पहावे न्याय देवता आम्हांवर केव्हां कृपा करील तें! शु० सु०

मोहादी निसर देशावर स्वारी करून येत आहे अशी वदंता आहे.

तापबहार व दुर्मगा या प्रांतांत भयंकर दुष्काळाची चिन्हे दिसत आहेत.

ब्रह्मदेशांत एक लोखंडी दगडाचा डोंगर सांपडला आहे. सध्यां ब्रह्मदेश हा आमचे राजकर्त्यांस रुपतीचा अगरच सांपडला आहे त्यांतच आमचे उद्योगी लोक कोणी शिरले तर काय वाईट; के०

गया प्रांतांत दुष्काळाची ओरड झाल्या वरून सर वेली साहेब तपासाला गेले होते ते म्हणतात कीं अज्जी पिक नाहीं असा थोडा भाग आहे. रिलीफ कामें थोडा बहुत सुरू केली म्हणजे बस आहे.

पर्शियन सरकारांनीं असा हुकूम सोडिला आहे कीं, अहवझ पलीकडे कोणती ही परकीय जहाजें येऊं नयेत व काराऊन नदीवर २४ तासांपेक्षां जास्तवेळ जहाजे ठेऊं नयेत. त्या हुकुमांत आणखी असें ही आहे कीं, परकीय लोकांस जमीन विकूं नये अगर कौलानें देऊं नये अगर सरकारचें कोणते ही कामास दुसरे देशाचे लोकांपासून भांडवल घेऊं नये. हा हूकूम सर्वांशीं इंग्लंडा विरुद्ध आहे.

मेजर मूर, सिकंदराबादचे कंटोनमेंटच्या डिस्ट्रिट ह्यांस हैद्राबाद संस्थानच्या रेसिडेंटाचें दुय्यम मदतगार नेमिलें आहे.

ट्रेनिंग कालेज नगर, नाशिक आणि खानदेश या जिल्ह्यां करितां धुळें येथें लवकरच ट्रेनिंग कालेजाची स्थापना होणार अशी दाट वदंता आहे. न्या० सिं०

सुधारणा करावी तर अशी करावी. बायकांच्या केसांत किंवा लग्नांत अथवा अभक्ष भक्षणांत सुधारणा करणें व्यर्थ होय. जपानांतील एका गृहस्थानें एक प्रकारचे बूट काढले असून त्या बुटांच्या योगानें पाण्यावर हवे तितके लांब चालतां येतें! ! ही सुधारणा जगाच्या उपयोगी किती आहे पहा! नाहीं तर आमच्या सुधारणा! ह्मणें धर्म सोडा ब्राह्मणांस महार करा, महारास ब्राह्मण करा, एके ठिकाणीं जेवा, स्त्रीपुरुषांतील फरक नाहींसा करा आणि फारच झालें तर बायांस आपले लग्नाचे नवरे सोडण्यांस सांगा! या सुधारणांनीं जगांस कोणता फायदा होणार कोण जाणें! पु० वे०

कलकत्ता व मुंबई यांचेमध्यें जलद जाणारी डांकेची गाडी—येत्या फेब्रुवारीचे १३ व्यो तारखेपासून कलकत्याहून विलायतेस जाणाऱ्या डांकेकरितां मुद्दाम जल्द वेगाची मेलगाडी निघत जाईल. ती प्रति बुधवारी सायंकाळी हौऱ्याहून ८ वाजतां निघून मुंबई येथें शुक्रवारीं दुपारीं ३ वाजतां पोंचेल. व तावडतोब डांक विलायतच्या बोटीवर चढेल, असें ठरलें आहे. या गाडींत भोजन करण्याचा एक डबा जोडण्याची जो पूर्वीची योजना होती ती तूर्त रहित केली आहे. मात्र मुख्य मुख्य स्टेशनांवर उपाहारासाठीं ही गाडी कांहीं वेळ थांबेल अलाहाबादची ता० २० जानेवारीची तार.

ड्यूकसाहेबांची स्वारी.—सेनापति ड्यूक आणि त्यांची पत्नी हीं येत्या २३ व्या तारखेस हैद्राबादेस येणार हे बुशीर बागेंत निजामसरकारचे पाहुणे ह्मणून राहणार आहेत. त्यांचे स्वागतार्थ येथें मोठी तयारी चालली आहे. जिकडे तिकडे निशाणें, पताकी व कमानी उभारण्याचें काम चाललें आहे. ड्यूकसाहेबाचे स्वागतदर्शनार्थ हैद्राबादेंत चोहोंकडे मोठा दिपोत्सव होणार आहे. शिकारी, कवाईती, खाने, वगैरेचेही मोठे समारंभ होतील. या महोत्सवा प्रीत्यर्थ ५ लाख रुपये खर्चण्याचा हूजूरचा ठराव झाला आहे. हैद्राबादची ता. १९ जानेवारीची तार. ज्ञा० च०

---

नोटीस

माधोजी रामाजी घाटे राहणार जळगांव वऱ्हाड यास खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी माझे साक्षात सासरे असून मी तुमचे मुलाची लग्नाची बायको आहे. आज माझा नवरा मयत होण्यास सुमारें ११ वर्षें जाहलीं. तेव्हांपासून मी माझे बापाचे घरी उदरनिर्वाह केला. माझा नवरा मयत जाहल्या नंतर माझे बापांनीं तुमचे घरीं आणून घातले होते त्याप्रमाणें मी कांहीं दिवस तुमचे घरीं होते घरांत सोय चांगली नसल्या वरून माझे घराचे साईबद्दल वारंवार सांगणें असले वरून तुह्मास राग येऊन तुह्मी मजला बापाचें घरीं पोंचविलें त्यांस अदमासें ४ वर्षें जाहलीं. मी आपल्या धर्मीप्रमाणें काशीस जाऊन विधी केला व रुपये १२९ खर्च जाहला. मी हल्लीं बापापासून निराळी आहे व तुमचे नावावर कर्ज काढून निरवाह करीत आहे. तुमचे व माझे जमेल अशाबद्दल आतां कांहीं आशा नाहीं याजकरितां असें कळवितों. की सदरील जाहलेला खर्च १२९ रुपये प्रीठगी खर्च रुपये १०० मिळून रुपये २२९ मजला तुह्मी नोटीस पावल्या पासून आठ दिवसांत आणून द्यावेत व पुढें माझ्या निरवाहाची सोय आपल्या नावाप्रमाणें करून द्यावी असें न केल्यास रीती प्रमाणे काम चालवून या नोटिशीचे खर्चासुद्धां अखेर निकाल होई पर्यंत जें नुकसान वगैरे होईल ते भरून घेतले जाईल कळावें तारीख २२ ज्यानेवारी सन १८८९ इसवी.

(सही)

भिमाई जवने माधोजी घाटे
राहणार आकोट तालुके आकाट.

---

नोटीस

चंद्रभान वल्लद विक्रमजी पाटील व खुशाल वल्लद चंद्रभान राहणार दगडखेड तालुके बाळापूर यांस नोटीस देणार मारुती वल्लद सटवाप्पा राहणार निंबे तालुके बाळापूर नोटीशीनें असें कळवितो कीं तुह्मां उभयतांकडे आमचे कर्ज रुपये व्याजा सुद्धां अदमासे येणें ४०० च्यारशे व जवारी वाढी दिढी सुद्धां येणें खंडी ३॥। पावणेचार निंबेमापाची व या खेरीज जामीनकीबद्दल येणें निराळे आहे आतां सदरहू रुपये व जवारी आजपावेतो तुह्मी आणून देऊन निकाल केला नाहीं करितां नोटीशीनें कळवितो कीं नोटीस पावल्यापासून ८ दिवसांत रुपये व जवारी आणून देऊन निकाल करावा असें न केल्यास रीती प्रमाणे काम चालवून अखेर निकाल होईपर्यंत या नोटिशीचे खर्चा सुद्धां सर्व नुकसान भरून घेतलें जाईल. ह्मणून दिली नोटीस सही तारीख २१ माहे ज्यानेवारी सन १८८९ इसवी.

(सही)

मारुती वल्लद सटवाप्पा
राहणार निंबे तालुके
बाळापुर दस्तुरखुद्द

---

☞ हें पत्र आकोला येथें के० बा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.